# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१५ / पौष १, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६९**

---

**नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील कैदी संचित**
**रजेचा फायदा घेऊन फरार झाल्याबाबत**

**(१) * २८६८७ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहामध्ये दहशतवादी कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले दोन कैदी संचित रजेचा फायदा घेऊन दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी फरार झाले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहामध्ये दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास चार मोबाईल फोन आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली तसेच सदर फरार कैद्यांच्या शोधाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहमधील दोन बंद्यांना संचित रजा देय नसताना मुक्त करण्यात आले. या घटनेस जबाबदार धरुन अधीक्षक, मध्यवर्ती

कारागृह नाशिकरोड तथा प्रभारी कारागृह उपमहानिरीक्षक आणि लिपिक, मध्य विभाग, औरंगाबाद यांचेविरुद्ध शासनामार्फत विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

कारागृहामध्ये ४ मोबाईल फोन आढळून आल्यामुळे नाशिकरोड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०६९/२०१५, भा.दं.वि. कलम १८८, कारागृह कायदा ४२, ४५ (१२) प्रमाणे अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, नाशिकरोड पोलीस स्टेशनकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

-----------------

**नाशिक येथे कुंभमेळ्याच्या कालावधीत गांजा आणि अंमली पदार्थांच्या होणा-या तस्करीबाबत**

**(२) * ३०२२० श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कुंभमेळ्यातील आखाड्याचे ध्वजारोहण झाल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत येथे दाखल होणाऱ्या साधूंकडून दिवसाकाठी १२० कोटींच्या गांजाची उलाढाल झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गांजा आणि अंमली पदार्थांची तस्करी करणारे काही दलाल कुंभमेळ्यानिमित्त शहरात सक्रीय झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही. नाशिक पोलीस आयुक्तालया अंतर्गत तसेच नाशिक पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन मध्ये कुंभमेळयातील आखाड्याचे ध्वजारोहण झाल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत अंमली पदार्थाबाबत कुठल्याही प्रकारचे गुन्हे दाखल नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमध्ये लागलेल्या आगीमुळे झालेले नुकसान

**(३) * ३६४०४ श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमध्ये दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ रोजी लागलेल्या आगीत सुमारे १०० दुकाने भस्मसात झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनास्थळी अग्निशमन दलाच्या १० बंब गाड्या उपलब्ध असूनसुध्दा त्यांना आग आटोक्यात आणण्यासाठी सुमारे अडीच तास लागल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगीमुळे व्यापाऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आग लागण्याची कारणे काय आहेत याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार सदर आगीत नुकसान झालेल्या व्यापा-यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महात्मा ज्योतीबा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट) येथे दिनांक २५.१०.२०१५ रोजी लागलेल्या आगीमध्ये ५३ दुकानांचे नुकसान झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर आगीमुळे व्यापाऱ्यांचे नुकसान झाले हे खरे आहे.

(४) सदर आग लागण्याची चौकशी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून, धुम्रपानाच्या जळत्या वस्तू निष्काळजीपणे फेकल्यामुळे आग लागली असे निष्कर्शाअंती सिध्द झाले.

आगीमध्ये झालेली नुकसान भरपाई देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही. त्यामुळे सदर आगीत नुकसान झालेल्या व्यापाऱ्यांना भरपाई देता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वस्त**
**घरकूल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४) * ३८६५८ ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **गृहनिर्माणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महापालिका राबवित असलेल्या केंद्र सरकारच्या "जे.एन.एन.यू.आर.एम." योजने अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी स्वस्त घरकूल प्रकल्पाच्या सन २००९ मध्ये निविदा काढण्यात आल्या, त्यावेळी जिल्हा दर सूची (DSR) प्रमाणे बांधकामाचा दर प्रती चौरस फुटाला ७०० ते ८०० रुपये होता व यावेळी खासगी बांधकाम व्यावसायिकांच्या प्रति चौरस फुटाला बांधकाम दर हा ६०० ते ७०० होता. मात्र त्यावेळी या योजनेतील ठेकेदारांना ११३५/- रुपये प्रति चौरस फुट दर देण्यात आले व नंतर इतर सुविधांच्या नावाखाली ३०० रुपये प्रति चौरस फुटाची वाढ करुन सदर बांधकाम दर प्रति चौरस फुटाला १४३५/- रुपये योजनेतील ठेकेदारांना देण्यात आला आहे. म्हणजे निविदेमध्ये "जिल्हा दर सूची" (DSR) पेक्षा सुमारे २०० कोटी रुपये जादाची निविदा मंजूर करुन सदर रकमेचा महापालिकेतील अधिकारी व पदाधिकारी यांनी संगनमत करुन गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेल्या अहवालानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बीएसयुपी योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार मे, २००८ मध्ये निविदा काढण्यात आल्या होत्या. सदर निविदांना कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक सुधारित करुन ऑक्टोंबर, २००८ मध्ये फेरनिविदा काढण्यात आल्या. त्यावेळी प्राप्त एकूण १७ निविदांपैकी सर्वात कमी दराच्या निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत.

सन २००८-०९ च्या जिल्हा दर सूचीनुसार घरबांधणीसाठी दर रु. १०१४.६० प्रती चौ.फुट इतका होता आणि निविदांमध्ये प्रत्यक्ष देण्यात आलेला दर सरासरी रु. ११३५ इतका आहे. जिल्हा दर सूचीच्या दराची प्रत्यक्ष दराशी तुलना करता येणार नाही. सदर दरवाढ होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.:-

१) Mivan (ॲल्युमिनियम फॉर्म शटरींग) या नवीन तंत्रज्ञानाचा वापर.

२) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (DPR) बांधकाम तळमजला + ४ (G+४) अशा पध्दतीचे होते. तथापि, निविदा पार्कींग + ७ अशा पध्दतीच्या इमारतीसाठी काढण्यात आली.

३) लिफ्टचा वापर.

४) फायर फायटींग सुविधा.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील धूपप्रतिबंधक बंधारे व इतर विकासकामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(५) * ३८७७६ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१० ते २०१४ या कालावधीत झाई, डहाणू गाव, धाकटी डहाणू, मुरबे, चिखल-डोंगरे, अर्नाळा, पाणजू, वरोर या क्षेत्रात मत्स्यव्यवसाय विकास विभाग व बंदरे विभाग यांच्या मार्फत धूपप्रतिबंधक बंधारे, जेटी बांधणे, खाडीतील गाळ काढणे व इतर विकासकामे ही पुर्णपणे निकृष्ट दर्जाची तर काही कामे अद्‌याप झालेली नसल्यामुळे ठेकेदार व अधिकारी यांनी करोडो रुपयांची शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रेंदाळ-यळगूड (ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर) येथे केंद्रीय राखीव पोलिस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारण्यास स्थानिकांनी केलेला विरोध**

**(६) * ३६९०२ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेंदाळ-यळगूड (ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर) येथे सुमारे २०० हून अधिक एकरांमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या परिसरातील सुमारे २०० हून अधिक शेतकरी, धनगर बांधव, दगड खाण व क्रशर व्यावसायिक तसेच परिसरातील शेकडो रहिवाशी बेघर व बेकार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रशिक्षण केंद्राच्या उभारणीस स्थानिक नागरिकांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भांडुप, मुंबई येथील सुखकर्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास कामात पात्र झोपडपट्टीधारकांना वगळल्याबाबत**

**(७) * ३१०५६ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भांडुप (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील सुखकर्ता सहकारी (एसआरए) गृहनिर्माण संस्थेच्या (एसआरए) कामांतर्गत २६९ घरकुल पुनर्विकास योजनेतंर्गत बांधण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्विकासाचे काम करणाऱ्या विकासकाने २६९ घरकुलांपैकी फक्त १२० झोपडपट्टी धारकांची अनुमती घेऊन एल.वाय. घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्विकासाच्या कामास उर्वरित १४९ म्हणजेच ६० टक्के झोपडपट्टी धारकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झोपडपट्टीधारक सन २००० पूर्वीपासून रहिवाशी असल्याने शासनाच्या नवीन सुधारित शासन निर्णय दिनांक १६ मे, २०१५ नुसार पात्रताधारक असतानाही १४९ झोपडपट्टीधारकांना वगळण्याची कारणे काय आहेत, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे याप्रकरणी पत्र पाठवून चौकशी करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी दिनांक ११ जून, २०१५ रोजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी मंत्रालयात बैठक लावून सुनावणी घेऊन सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील वगळलेल्या १४९ झोपडपट्टी धारकांना पात्र करण्यात आल्याशिवाय कलम ३३/३८ अन्वये कार्यवाही करु नये असे स्पष्ट आदेश, एसआरए पुनर्विकास प्रकल्पातील उपजिल्हाधिकारी यांनी नियमबाह्य १४९ झोपडपट्टीधारकांना पाठविलेली नोटीस मागे घ्यावी असेही निदेश दिले असताना आतापर्यंत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मौजे कांजूर तालुका कुर्ला येथील न.भू.क्र. २३७ (पै) या जमिनीवरील सुखकर्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या योजनेचे परिशिष्ट-२ अप्पर जिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी यांचेकडून दिनांक ५.५.२०१२ व पुरवणी परिशिष्ट-२ दिनांक ३०.१.२०१३ निर्गमित करण्यात आल्या आहेत. या परिशिष्ट-२ नुसार एकूण २६९ झोपडीधारकांपैकी १२० झोपडीधारक पात्र ठरले असून ७० टक्क्यापेक्षा अधिक म्हणजेच ११३ झोपडीधारकांनी संमती दिल्यानंतर सदर योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक १६.१.२०१४ रोजी आशयपत्र दिलेले असून दिनांक १८.१२.२०१४ रोजी पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे आराखडे मंजूर करण्यात आले आहे.

दिनांक १०.११.२०१५ रोजी निर्गमित केलेल्या दुसऱ्या पुरवणी परिशिष्ट-२ नुसार एकूण २६९ पैकी २१२ झोपडीधारक पात्र ठरले असून त्यापैकी १४८ झोपडीधारकांची योजनेस संमती आहे.

(४) मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण यांना उचित कार्यवाही करुन मा.लोकप्रिनिधींना कळविण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेतील २६९ झोपडीधारकांपैकी २१२ झोपडीधारक पात्र ठरल्याने योजनेतील पात्र ठरलेल्या झोपडीधारकांची संख्या जवळपास ८० टक्के इतकी आहे.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांच्या पात्र/अपात्रतेबाबतचा सुनावण्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या तसेच अपीलीय प्राधिकाऱ्याच्या स्तरावर घेतल्या जातात.

सदर योजनेतील असहकार्य करणाऱ्या ७० झोपडीधारकांविरुध्द कलम ३३/३८ अन्वये लवकर कार्यवाही करण्यासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात विकासकाने दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक १६९४/२०१५ मध्ये दिनांक २६.६.२०१५ रोजी १२ आठवड्यामध्ये गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे सक्षम प्राधिकाऱ्यास आदेश दिले होते. त्यानुसार दोन्ही पक्षकारांना नोटीस देवून व सुनावणी घेवून सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिनांक २३.९.२०१५ रोजी अंतिम आदेश पारित केले आहे.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोयसर कांदिवली (पूर्व) येथे भाजीवाडी, गावदेवी रोड भागामध्ये गुन्हेगारीचे अनेक प्रकार घडत असल्याबाबत

**(८) * २९१५२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोयसर कांदिवली (पूर्व) येथील भाजीवाडी, गावदेवी रोड भागामध्ये गुन्हेगारीचे अनेक प्रकार घडत असून दरोडे, छेडछाडीच्या प्रकारामध्ये दरेकर टोळी कार्यरत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरेकर टोळीचे प्रमुख तडीपार असताना या परिसरात वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुंड टोळीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दरेकर बंधु व त्यांच्या साथिदारांविरूध्द समता नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३४४/२०१५ भा.द.वि.स. कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९ सह कलम ३७(१) म.पो.का. अन्वये दिनांक ०९.०७.२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.

(३) उपरोक्त गुन्हयामध्ये एकुण ९ आरोपींना अटक करण्यात आलेली असून अटक आरोपींविरूध्द न्यायालयामध्ये दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहे त्याचा कोर्ट केस क्र. २८२८/पीडब्ल्यु/२०१५ असा आहे.

सदर गुन्हयातील दोन आरोपींविरूध्द यापुर्वीच दोन वर्षाकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातून तर एका आरोपीस मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातून एक वर्षाकरिता हद्दपारीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे इतर तीन आरोपींविरूध्द यापूर्वी चांगल्या वर्तणूकीचे अंतिम बंधपत्र घेण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट प्रा.लि. व भारतीय विमानतळ प्राधिकरण मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टया हटवून पुनर्विकास करण्याबाबत**

**(९) * ३८६६४ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट प्रा.लि. व भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या मालकी हक्काच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टया तेथून हटवून त्यांचा पुनर्विकास करुन जमिन मोकळी करण्याकरिता शासनाने मुंबई महानगरीय प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA) व मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट प्रा.लि. यांच्यात करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरीय प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (MMRDA) विकासक म्हणून मेसर्स हाऊसिंग डेव्हलमेन्ट अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (HDIL) यांची विकासक म्हणून नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट प्रा.लि. यांच्या जागेवरील झोपडयांचे पुनर्वसन करण्याकरिता बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये विकासकाने खाजगी प्रकल्पातील व काही ठिकाणी सदनिकांची विक्री करुन ज्या उद्देशांकरीता विकासकाची नेमणूक करण्यात आली होती त्यात गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकासकाबरोबर करार करणारे मुंबई महानगरीय प्रादेशिक विकास प्राधिकरणाचे अधिकारी व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकारी यांनी सदर बाबत माहिती असूनही दुर्लक्ष केल्यामुळे त्याच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

भारतीय विमानपतन प्राधिकरण (AAI) व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. (MIAL) यांच्यात दिनांक ०४.०४.२००६ रोजी झालेल्या Opration Management & Development Agreement (OMDA) या कराराअन्वये MIAL यांनी विमानपत्तनाच्या जमिनीवरील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करुन जागा मोकळी करावयाची आहे.

विमानपतन प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांनी अतिक्रमीत केलेली जागा निष्कासित करण्यास मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. (MIAL) यास सहाय्य व समन्वयाकरीता मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. (MIAL) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यामध्ये दिनांक १२ डिसेंबर, २००६ रोजी करार झालेला आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या मालकी हक्काच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टया तेथून हटवून त्यांचा पुनर्विकास करुन जमिन मोकळी करण्याची जबाबदारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि.(MIAL) यांची आहे.

(२) नाही.

विमानतळाच्या जागेवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरिता मुबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांनी मे.हाऊसिंग डेव्हलपमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रचर लि.(HDIL) यांची विकासक म्हणून नेमणूक केलेली होती.

(३) मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट प्रा. लि. यांच्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन करण्याकरीता प्रिमियर कुर्ला येथे बांधलेल्या दोन इमारतींचा विकासकाने इतर झोपडपट्टी पुनवर्सन योजनांमधील झोपडीधारकांसाठी ट्रान्झीस्ट कॅंप म्हणून वापर केला असून विकासकाकडून भाडे वसूल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. विकासकाने पुनर्वसन सदनिकांची विक्री केल्याची बाब आढळून आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्तीकर म्हणून वसुल केलेली रक्कम प्राप्तीकर विभागाकडे भरण्यात आली नसल्याबाबत

**(१०) * २९८५१ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्तीकर म्हणून वसुल केलेली रुपये ७५ कोटीची रक्कम प्राप्तीकर विभागाकडे भरण्यात आली नसल्यामुळे प्राप्तीकर विभागाने महानगरपालिकेला ६ कोटी रुपये दंड व आणखी १११ कोटी रुपये भरण्याबाबत सूचना केली असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीअंती काय आढळून आले व तद्नुसार सदर प्राप्तीकराची रक्कम न भरणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आयकर विभागाकडून रुपये ६ कोटी एवढा दंड व रुपये १११ कोटी भरण्याबाबतची कोणतीही सूचना महापालिकेस प्राप्त झालेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१४-१५ पर्यंत कर्मचारी, कंत्राटदार तसेच निवृत्तीवेतनधारक यांच्याकडून वसूल केलेला आयकर वेळोवेळी आयकर खात्यात जमा केलेला आहे.

सन २०१४-१५ मध्ये ७००० मालमत्ता कराच्या परताव्यापोटी टीडीएसचे रुपये ६.४३ कोटी आणि व्याजापोटी रुपये १.३४ कोटी एवढे अधिदान दिनांक २८.०७.२०१५ रोजी आयकर विभागास केलेले आहे.

तथापि, आयकर विभागाने रु.७४.८१ कोटी एवढी रक्कम दिनांक २८.०३.२०१५ रोजी महापालिकेच्या खात्यातून परस्पर वळती करुन घेतली आहे.

(२), (३) व (४) याबाबत पडताळणी करुन ताळमेळ घालण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एका सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर पडताळणी दरम्यान इतर विसंगती व त्रुटींमुळे आयकर विभागाकडे महापालिकेच्या कर्मचारी, कंत्राटदार व निवृत्तीवेतनधारक यांच्याकडून पूर्ण रक्कम वसूल केली असतांनाही व महानगरपालिकेने वसूल केलेली रक्कम पूर्णपणे भरणा केली असतांनाही आयकर विभागाकडे कमी जमा झाल्याचे आढळून आलेले आहे.

सदर सल्लागार संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आयकर विभागाकडे पुनर्विवरणपत्र सादर करुन आयकर खात्याने वळती करुन घेतलेली रक्कम परत मिळविण्यासाठी महापालिकेमार्फत दावा करण्यात येईल.

तसेच या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांची प्राथमिक चौकशी करण्याचे निर्देश महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले आहेत.

-----------------

## मुंबईतील मरोळ येथील पोलीस वसाहतीच्या संरक्षण भिंतीची झालेली पडझड

**(११) * ३२३१२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरोळ येथील जवळपास ४३ इमारतींच्या पोलीस वसाहत परिसरात सशस्त्र पोलीस दल- ४ शाखा आणि पोलीस प्रशिक्षण केंद्र असून या वसाहतीच्या सुमारे एक किलोमिटर लांबीच्या संरक्षण भिंतीची पडझड सुरु झाल्याने या परिसरात चोऱ्या होत असून शेजारी असलेल्या जंगलामुळे हिस्त्र श्वापदांची भिती निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस कर्मचारी वसाहतीत होत असलेल्या चो-या रोखण्याबाबत व शस्त्रसाठ्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने संरक्षण भिंत बांधण्याबाबत कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मरोळ येथील पोलीस अधिकारी अंमलदार यांना राहण्यासाठी ४५ इमारती आहेत. मरोळ पोलीस वसाहतीच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळील रस्त्याकडील संरक्षण भिंतीची पडझड झालेली आहे. या वसाहतीमध्ये चो-या होत असल्याची अभिलेख नोंद आढळून येत नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे हिंस्त्र श्वापद वावरल्याची अथवा हल्ला केल्याची कोणतीही घटना घडलेली नाही. संरक्षण भिंत बांधण्यासाठी रुपये १,५०,००,०००/- इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागास अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदामातून चोरीला गेलेले मोबाईल फोन ठाणे शहर पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी वापरत असल्याबाबत**

**(१२) * २८५०४ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदामातून चोरीला गेलेले नामांकित कंपन्याचे महागडे मोबाईल फोन ठाणे शहर पोलीस दलातील गुन्हे अन्वेषण विभागातील काही वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वापरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती किती वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे चोरीचे मोबाईल, लॅपटॉप व संगणक आढळून आले व तद्नुसार संबधीत वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रकरणी भिवंडी तालुका पोलीस स्टेशन मध्ये भिंवडी गुन्हे शाखेमधील एक पोलीस हवालदार यांच्या विरुध्द गु.र.क्र.७८/१५ भा.द.वि.स. कलम ४५७, ३८०, ३४, ४११ अन्वये गुन्हा दाखल आहे.
(२) व (३) दाखल गुन्ह्यामध्ये आरोपी पोलीस हवालदार यांना अटक केली आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात पोलीस आयुक्त, ठाणे शहर मधील १ पोलीस निरिक्षक, १ पोलीस हवालदार, २ पोलीस नाईक, ३ पोलीस शिपाई यांचेकडून एकूण १४ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत सदर गुन्ह्यात त्यांच्या सहभाग आहे किंवा कसे याबाबतचा अधिक तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील बारापुल्ल, मकई गेट आणि महेमुद दरवाल येथील तीन पुलांचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(१३) * ३३१७० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील बारापुल्ल, मकई गेट आणि महेमुद दरवाल सह येथील ऐतिहासिक वारसा असलेल्या तीन पुलांचे नुतनीकरण गेल्या ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तीन पुलांचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्‍याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहणा-या खाम नदीवर बारापुल्ल, मकई गेट आणि महेमुद हे पूल असून त्यांचा समावेश राज्य संरक्षित स्मारकात करण्यात आलेला नाही. सदर पुलांचे जतन व दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

औरंगाबाद महानगरपालिकेस राज्य शासनाने रस्ता अनुदानाअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये रु. १२.४८ कोटी व सन २०१५-२०१६ मध्ये रु. ५.४९ कोटी इतके अनुदान मंजूर केले आहे. रस्ता अनुदानाअंतर्गत पुलांच्या नुतनीकरणाचे काम अनुज्ञेय आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**ठाणे येथील बीएसयूपी योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१४) * ३०५३६ ॲड.के.सी. पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात राज्य शासनाच्या मदतीने बीएसयूपी योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतंर्गत सिध्दार्थनगर, कोपरी, कौसा, मुंब्रा, तुळशीधाम, वसंतविहार, धर्मवीरनगर या ठिकाणी असलेल्या झोपडपट्टयांच्या जागी १४ इमारती उभारल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीमध्ये झोपडपट्टीतील लोक तसेच इतर बाधित लोकांना लॉटरी काढून घराचे वाटप करण्याचा नियम असताना व घर वाटपाचे काम स्वतंत्र जबाबदार यंत्रणेकडून करणे आवश्यक असताना, घरवाटपाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांमार्फत पार पाडून, एका व्यक्तीला एक घर असा नियम असताना, काही जणांना ४-४ घरांचे तर काहींना १० ते १४ घरांचे वाटप केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे व एका पेक्षा अधिक घरे घेणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे आहे.
(२) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या बीएसयुपी योजनेअंतर्गत तुळशीधाम, सिध्दार्थ नगर, महात्मा फुले नगर, खारटन व कौसा येथील ३३ इमारती/२७२१ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही. बांधकाम पूर्ण करण्यात आलेल्या २७२१ सदनिकांपैकी २४६६ सदनिकांचे योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार व ठाणे महानगरपालिका यांच्या धोरणानुसार लाभार्थ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे महानगरपालिकेकडून संगणकीय सोडतीव्दारे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गोवंश हत्या बंदीविषयीचा कायदा लागू असताना नंदूरबार येथे बेकायदेशीरपणे गोहत्या होत असल्याबाबत

**(१५) * ३५५७६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये गोवंश हत्या बंदी कायदा लागू असतांना मध्यप्रदेश आणि गुजरात राज्यातून नर्मदा काठावरून धडगावमार्गे अवैधपणे मोठ्या प्रमाणावर गोवंश तस्करी केली जात असून नंदूरबार, शिरपूर येथे आणून त्यांची राजरोसपणे हत्या केली जाते. या विरोधात कठोर कारवाई करण्यासाठी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी नंदूरबारमध्ये हिंदु जनजागृती समितीचे डॉ. नरेंद्र पाटील यांनी मा. मुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून निवदेन दिले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या पूर्वी उपरोक्त विषयासंदर्भात दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी मा. गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांना हिंदु जनजागृती समितीने लिखित तक्रार केली होती. त्यावर पोलीस अधीक्षक, नंदूरबार यांनी कारवाई करुन धडगाव पोलीस ठाण्यात गोवंश तस्करीच्या विरोधात कारवाई केली व तेथे पहाऱ्यासाठी पोलीस तैनात केल्याची माहिती दिनांक २७ मार्च, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे दिली होती; मात्र तेथील गोवंश तस्करी वा गोहत्या पूर्णपणे थांबलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गोवंश तस्करी वा गोहत्या करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कत्तलीसाठी अवैध जनावरे वाहतूकीचे उच्चाटन करण्यासाठी पो.स्टे.धडगांव हद्दीतील देवबारा घाट, पो.स्टे. म्हसावत हद्दीतील दरा-चिचलाबारी, म्हसावत-चिखली फाटा व खेतिया मध्यप्रदेश सिमेलगत खेडदिगर व गुजरात राज्याच्या सिमेलगत कुकरमुंडा फाटा येथे तसेच पो.स्टे. धडगांव अंतर्गत देवबारा घाटात तात्पूरती पोलीस चौकी उभारण्यात आली आहे.

दिनांक २२.७.२०१५ रोजी पो.स्टे. धडगांव येथे गु.र.क. १७/२०१५, प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा १९६० चे कलम ११ (१)(अ),(ग)(इ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ अन्वये १२ गुन्हे दाखल असून एकुण रु. ४२,९७,०००/- चा माल जप्त करण्यात आला तसेच नंदुरबार शहरात बेकायदेशिर कत्तल केलेले जनावराचे मास मिळाल्याने पो.स्टे. नंदुरबार शहर येथे गु.र.नं. ६५/२०१५ तसेच गु.र.नं. ६६/२०१५ गोहत्या सुरक्षा कायदा, प्राणी संरक्षण विधेयक १९९५ चे कलम ५,५(क), ९,९(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नर्मदा काठावरुन कोणत्याही प्रकारची गोवंश वाहतूक कत्तलीसाठी केली जात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व ठाणे येथे बनावट नोटांची विक्री होत असल्याबाबत

**(१६) * ३२८३९ श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे या महानगरामध्ये बनावट नोटा पोहोचविण्याचे काम परराज्यातून येणाऱ्या मजूरांमार्फत केले जात असून ठाणे येथील कळवा भागात बनावट नोटांची विक्री करणाऱ्या अब्दुल जब्बार शेख व शाहीर शमशुल मोमीन या दोघांना खंडणीविरोधी पथकाने अटक केल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० हजार रुपयांत एक लाख रुपयाच्या बनावट नोटा मिळत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अशंतः खरे आहे.

दिनांक ०६.०९.२०१५ रोजी कळवा (जि.ठाणे) येथे दोन व्यक्ती बनावट चलनी नोटा विकण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडून १००० रूपये दराच्या ३७५ भारतीय चलनातील नोटांप्रमाणे दिसणा-या बनावट नोटा जप्त केलेल्या आहेत. त्याबाबत त्यांचे विरूध्द ठाणे नगर पोलीस स्टेशन गु.र.क्र.१९३/१५ भादविस कलम ४८९(ब) (क), ४२०, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदर अटक आरोपी हे भारतीय चलनातील ३० हजार रूपयांच्या बदल्यात १ लाख रूपयांच्या भारतीय चलनातील नोटांप्रमाणे दिसणा-या बनावट नोटा विकण्यासाठी आले होते.

(३) होय.

सदर गुन्हयाचे तपासात नमुद आरोपीतांकडून जप्त करण्यात आलेल्या भारतीय चलनातील नोटांप्रमाणे दिसणा-या बनावट नोटा या तपासाकरीता जनरल मॅनेजर, इंडियन करन्सी नोट प्रेस, नाशिक रोड, जिल्हा नाशिक यांचेकडे पाठविण्यात आल्या होत्या. सदर नोटा बनावट असल्याबाबत अभिप्राय प्राप्त झाला आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) येथील पोलीस ठाण्याच्या जुन्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(१७) * २९१०६ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या इमारतीचा प्रस्ताव शासनाने २००७ मध्ये मंजूर केला असून सदर कामाकरिता शासनाने आर्थिक तरतूद केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातामध्ये मोडतोड झालेली वाहने, फुटलेली गटारे त्यामुळे पसरलेली दुर्गंधी, आरोपीच्या कोठड्यांसह सर्वच खोल्यामधून गळणारे पाणी, परिसरात स्वच्छतेचा अभाव यामुळे पोलीस ठाणे परिसराला बकाल स्वरूप प्राप्त झाले असून पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुन्या इमारतीमध्ये अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने इमारतीच्या बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्याच्या इमारतीचा प्रस्ताव शासनाने २००७ मध्ये मंजूर केलेला नसून, सदर कामाला शासनाने कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शाहूवाडी जि.कोल्हापूर येथे नविन प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव जुन्या दरसूचीवर आधारीत असल्याने बांधकामाच्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या किमतीमध्ये होणारी वाढ विचारात घेता, सन २०१४-१५ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रकांचा सुधारीत प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर व डहाणू तालुक्यातील खारभूमी योजनेअंतर्गत ९ गावात धुप प्रतिबंधक बंधारे बांधण्यास मान्यता मिळण्याबाबत**

**(१८) * ३९३९३ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व डहाणू तालुक्यातील खारभूमी योजनेअंतर्गत ९ वेगवेगळया गावात मौजे उमरोळी, पानटेंबी, धनसार, दारशेत (उंबरपाडा) डोंगरे, शिरगाव ता. पालघर व वरोर, वाणगाव, हेडणे ता. डहाणू हे सी.आर.झेड अंतर्गत येत असल्याने या गावात धुप प्रतिबंधक बंधारे बांधण्याकरिता पर्यावरण विभागाची मान्यता मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी सचिव, पर्यावरण विभाग यांस दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांमध्ये भरतीच्या वेळी पाणी शिरत असल्याने हया ठिकाणच्या जमीनींची प्रचंड धूप होवून जमीन नापीक होत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु नुकसान होऊ नये म्हणून पर्यावरणासंबधीची मान्यता तातडीने घेऊन ९ गावांमध्ये धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पालघर व डहाणू तालुक्यातील ९ खारभूमी योजनांपैकी ४ गावांचे प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरेटीकडे प्राप्त झाले असून मौजे उमरोली, पामतेंबी, वानगाव (ता.पालघर) या खारभूमी योजनांचे सी.आर.झेड. विषयक अनुमतीसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरेटीच्या ७८ व्या बैठकीतील निर्णयानुसार केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे शिफारस करुन पाठविण्यात आले आहेत. तसेच धनसार (ता.पालघर) खारभूमी योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरेटीच्या १०५ व्या बैठकीत ठेवण्यात आला असता खारभूमी विभागाने जलद पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (Rapid EIA) तयार करण्यात येत असल्याने मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) शहरातील पोलीस वसाहतीची झालेली दुरवस्था

**(१९) * ३१०७५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) शहरातील जुनी ब्रिटीशकालीन पोलीस वसाहतीची अत्यंत दुरावस्था झाली असून पावसाळ्यात कौलारू छप्परातून पाण्याची गळती होणे, पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था नसणे तसेच शौचालये नादुरुस्त व निरुपयोगी झाले असून पोलीस कर्मचाऱ्यांना सदर वसाहतीत राहणे असह्य होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर निवासस्थाने ही ब्रिटीशकालिन आहेत. निवासस्थानांचे छप्पर पत्र्याचे व त्यावर मंगलोरी कौले आहेत. निवासस्थानाच्या भिंती दगडी बांधकामाच्या असून बांधकाम फार वर्षापूर्वीचे असल्यामुळे पावसाळ्यामध्ये भिंती पाझरतात.

येथील १२ निवासस्थानांमध्ये सन २०१२ साली फरशी बसविण्यात आलेली आहे. सदर निवासस्थानांकरिता ग्रामपंचायत, पाटण यांचे मार्फत पाण्याचा पुरवठा केला जातो.

पाटण पोलीस ठाण्याच्या २ अधिकारी व ३८ कर्मचा-यांसाठी निवासस्थाने बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन एकूण रुपये २७९.०० लक्ष इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत महानगरपालिकेकडून दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२०) * ३०४९५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यापैकी आठ टक्के पाणी दूषित असल्याचे पालिकेच्या अहवालात स्पष्ट झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आठ टक्क्यांपैकी दोन टक्के पाण्यात ई-कोलाय जिवाणु आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुंबई शहराला शुध्द पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पुरवठा करण्यात येणा-या पाण्यापैकी ८% पाणी दुषित आहे हे खरे नाही. तथापि, माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१५ मध्ये चाचणी केलेल्या पाण्याच्या नमुन्यांपैकी अनुक्रमे ४.०८% व ८.२९% इतके पाण्याचे नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास आले.

(२) माहे ऑगस्ट २०१५ मध्ये ०.३५% व माहे सप्टेंबर २०१५ मध्ये ०.९४% इतक्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये ई-कोलाय जीवाणू आढळून आले होते.

(३) तुळशी, विहार, तानसा, वैतरणा (मोडकसागर), मध्य वैतरणा हे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील तलाव तसेच उर्ध्व वैतरणा व भातसा हे शासनाच्या अखत्यारीतील दोन तलाव असे मिळूण सात तलाव हे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा करण्याकरीता मुख्य पाण्याचे स्त्रोत म्हणून वापरले जातात.

या मुख्य स्त्रोतातून घेण्यात आलेले पाणी हे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी स्थित शुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते. यासाठी महानगरपालिकेची भांडुप संकुल, पांजरापूर संकुल तसेच तुळशी व विहार येथील शुध्दीकरण केंद्रे २४ तास कार्यरत आहेत.

या केंद्रामध्ये निवळणे (Sedimentation), जलगाळणी (Filteration) व हरिणीकरण (Chorination) या मान्यताप्राप्त क्रियांव्दारे जलशुध्दीकरण आयएस-१०५०० १९९१ या भारतीय मानकातील निकषाप्रमाणे केले जाते. तसेच सदर शुध्दीकरण केंद्रांमधील प्रयोगशाळेत दर तासाला पाण्याची चाचणी करुन पाण्याच्या योग्यतेची खात्री केली जाते. तसेच महानगरपालिकेच्या विविध जलशयांमध्ये पुन्हा हरिणीकरण करुन पाण्याच्या शुध्दतेबाबत योग्य नियंत्रण ठेवले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात रेबीज प्रतिरोधक लसीचा तुटवडा असल्याबाबत

**(२१) * २८९७१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात श्वानदंशावर उपचार करण्यासाठी शासकीय व खाजगी रुग्णालयात गत ४ महिन्यांपासून रेबीज प्रतिरोधक सिरम व रेबीज विरोधी औषधांच्या लसींचा तुटवडा असल्याने याबाबतच्या तक्रारी रुग्णांनी व त्यांच्या

नातेवाईकांनी वारंवार विभागीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर (इंजेक्शन) लस उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर लस (इंजेक्शन) तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

- औरंगाबाद शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रेबीज प्रतिरोधक सिरम व रेबीज प्रतिरोधक लसींचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र महानगरपालिकेच्या रुग्णालयात रेबीज प्रतिरोधक सिरम उपलब्ध नाही.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे श्वानदंश रुग्णांवर वैद्यकीय तज्ञांच्या देखरेखाली औषधोपचार केले जातात.
- औरंगाबाद महानगरपालिकेच्या ०५ रुग्णालय व २५ आरोग्य केंद्रामार्फत नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.
- श्वानदंश रुग्णांस महापालिकेच्या ५ रुग्णालयांमधून प्रतिरोधक रेबीज लस देण्यात येते.
- श्वानदंश रुग्णास पुढील उर्वरित मात्रासाठी शासकीय वैद्यकीय रुग्णालयाकडे संदर्भीत केले जाते.

(२) सद्यस्थितीत, महापालिकेच्या रुग्णालयात रेबीज प्रतिरोधक लस ३०६४ व्हायल्स शिल्लक आहेत. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे रेबीज प्रतिरोधक लस २०६८ व्हायल्स व रेबीज प्रतिरोधक सिरम २९ व्हायल्स शिल्लक आहेत.

(३) महापालिका रुग्णालयासाठी रेबीज प्रतिरोधक सिरम खरेदी करण्याची प्रक्रिया चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेच्या विविध रुग्णलायात हिमोग्लोबीन तपासणीच्या मशिन्स बंद असल्याबाबत

**(२२) * ३७९९१ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या विविध रुग्णालयात रक्त (हिमोग्लोबीन) तपासणीकरिता बसविण्यात आलेल्या ४० मशिन बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे गोरगरीब रुग्णांना खाजगी लॅबमध्ये तपासणी करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या विविध रुग्णालयातील रक्त (हिमोग्लोबीन) तपासणीच्या सर्वच मशिन बंद पडण्याची कारणे काय आहेत व या मशिन तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रक्त (हिमोग्लोबीन) तपासणीचे कोणतेही मशीन बंद नसून, सर्व मशीन्स सुस्थितीत आहेत.

तथापि, सदर मशीन्ससाठी आवश्यक असणाऱ्या स्ट्रीप्स संपुष्टात आल्याने सुमारे २० बाह्यरुग्ण विभागातील रक्त (हिमोग्लोबीन) तपासणी काही काळ बंद ठेवण्यात आली होती.

(२) गरीब रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून इतर पध्दतीने (साहली हिमोग्लोबीनोमीटर व्दारे) रक्त (हिमोग्लोबीन) तपासणी चालू ठेवण्यात आली होती. तसेच रक्त नमुने गोळा करुन मध्यवर्ती प्रयोगशाळेत पाठवून रुग्णांना रक्त (हिमोग्लोबीन) तपासणी अहवाल देण्यात येत होता.

(३) सदर मशीन्स सुस्थितीत आहेत, तथापि, स्ट्रीप्स संपुष्टात आल्याने काही काळ रक्त तपासणी बंद ठेवण्यात आली होती.

निविदा प्रक्रीया राबवून स्ट्रीप्स खरेदी करण्यात येऊन सदरच्या मशीन्सद्वारे रक्त (हिमोग्लोबीन) तपासणी कार्यान्वित करण्यात आली आहे.

आज रोजी मशीन सुरु असून स्ट्रीप्स ही उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोरबे धरणाची (ता.पनवेल,जि.रायगड) खोली वाढविण्याबाबत**

**(२३) * ३८७५६ श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील संपूर्ण क्षेत्राला (ता. पनवेल, जि.रायगड) येथील मोरबे धरणामधून पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धरणाची क्षमता १९०.०० दक्षलक्ष घनमीटर असून ग्लोबल वॉमिंग झालेल्या पर्जन्यमानामुळे धरणामधील पाण्याचा साठादेखील दिवसेंदिवस अपुरा पडत असल्याने धरणाची खोली वाढवून पाण्याचा साठा वाढविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (बेलापूर) यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू धरणाची खोली वाढविण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) मोरबे धरणाची खोली वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीस अनुसरुन तपासणी करण्यात येईल, असे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

-----------------

**स्मार्ट सिटीसह अमृत मिशन योजनेत महापालिकांना अतिरिक्त भुर्दंड सोसावा लागणार असल्याबाबत**

**(२४) * ३३१३५ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटीबरोबरच केंद्र शासनाकडून जाहिर करण्यात आलेल्या (अमृत मिशन) योजनेत महापालिकांना निधीसाठी अंदाजे १७ टक्क्यांचा अतिरिक्त भूर्दंड

सहन करावा लागणार असून केंद्राच्या यापूर्वीच्या जेएनएनयुआरएम योजनेत एकूण प्रकल्पांच्या २० टक्के रक्कम महापालिकांना खर्च करावी लागत होती, मात्र (अमृत मिशन) मुळे जास्त रक्कम खर्च करावी लागणार असल्याने संबंधित महापालिकांची आर्थिक स्थिती डबघाईला येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीच राज्यातील महापालिकांमधील स्थानिक संस्था कर (एलबीटी) बंद केल्याने महापालिकांची आर्थिक स्थिती बिघडली असून केंद्राच्या उक्त योजनेचा अतिरिक्त भार पडणार असल्याने महापालिकांना नवीन प्रकल्प उभारणे अवघड होणार आहे हे पाहता शासनाने त्वरीत याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याकरिता केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेच्या युआयजी उपभियानांतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात केंद्र शासनाकडून प्रकल्प किंमतीच्या ३०% ते ८०% पर्यंत तर युआयडीएसएसएमटी अभियांनातर्गत प्रकल्प किंमतीच्या ८० टक्के इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत होते.

अमृत अभियानांतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात प्रकल्प किंमतीच्या ३३ ते ५० टक्के अनुदान उपलब्ध करण्यात येणार आहे.

(२) व (३) अमृत अभियानांतर्गत एक दशलक्षपेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांसाठी प्रकल्प किंमतीच्या एक तृतीयांश तर एक दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के असा वित्तीय आकृतीबंध केंद्र शासनाने निश्चित केला आहे. राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज संस्था उर्वरीत हिश्याचा वित्तीय आकृतीबंध राज्य शासनाने निश्चित केला आहे. त्यानुसार अभियान शहरांनी स्वहिश्याचा निधी उभारणे आवश्यक आहे.

स्थानिक संस्था कर बंद केल्यामुळे येणारी तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून महानगरपालिकांना सहायक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-----------------

## नाहूर (मुंबई) येथील झोपडपट्टीवासीयांना पुनर्वसन वसाहत (बी-१, बी-२) इमारतीत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(२५) * ३३३३७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या प्रचलित ध्येयधोरणाशी सुसंगत असलेल्या बाबींसंदर्भात लोकप्रतिनिधींकडून संबंधित विभाग प्रमुख वा त्यांच्या अधिनस्त असलेल्या मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण, एमयुटीपी (मेट्रो रेल्वे-१), प्रकल्पातंर्गतच्या अनुक्रमे वर्सोवा, घाटकोपर, भीम नगर परीक्षेत्रातील निष्कासित करण्यात आलेल्या ३६१ झोपडपट्टीवासीयांना नाहूर (मुंबई) येथील पुनर्वसन वसाहत (बी-१,बी-२) इमारतीत कायमस्वरूपी प्राधान्य तत्वावर सदनिका/संकुलात सामावून घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री, मा. राज्यमंत्री (नगरविकास), मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण), आयुक्त तथा अप्पर आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका तथा मुंबई महानगर विकास आयुक्त) यांच्याकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये लेखीनिवेदनाद्वारे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) च्या गोषवाऱ्यानुसार म्हाडा, महापालिका प्रशासन व इतर अधिनस्त उपकार्यालयांकडून लोकप्रतिनिधींच्या मौलिक सूचनांकडे दुर्लक्ष केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निवेदन मुंबई महानगर प्राधिकारणाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. परंतु ३६१ व्यक्तींनी बोगस कागदपत्रांच्या आधारे नाहूर येथील पुनर्वसन वसाहतीमध्ये सन २०१० च्या सुमारास घुसखोरी करुन सदनिकांचा जबरदस्तीने ताबा घेण्याचा प्रयत्न केला असता प्राधिकरणाने अशी घुसखोरी होऊ दिली नाही. त्यानंतर सन २०११ मध्ये सदर व्यक्तींनी सिटी सिव्हील कोर्टात सूट (२०५६/२०११) दाखल केला आहे.

सद्यस्थितीत सिटी सिव्हील कोर्टात सदर सूटबाबत निर्णय प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरण न्याय प्रविष्ट असून मुंबई महानगर प्रवेश विकास प्राधिकरणाद्वारे आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**देवनार आणि मुलुंड, मुंबई येथील कचराभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याच्या कामात कुचराई करणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याबाबत**

**(२६) * ३८२३२ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील देवनार आणि मुलुंड कचराभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याच्या कामात कुचराई करणाऱ्या ग्लोबल एनव्हायरमेंट आणि तत्व ग्लोबल रिन्यूएबल एनर्जी कंपनींवर कायदेशीर कारवाई करुन काळ्या यादीत टाकण्याची मागणी शहरातील जागरुक नागरीक, विविध सामाजिक पर्यावरण संस्थाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.पर्यावरण मंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास/पर्यावरण) यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशीअंती कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीवर्धन (जि.रायगड) येथे पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीचा स्लॅब कोसळल्याबाबत**

**(२७) * ३७१३८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) नगरपालिका हद्दीतील नागरीकांना पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीचा स्लॅब दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी कोसळला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्लॅब कोसळल्यामुळे जीर्ण झालेली पाण्याची टाकी केव्हाही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाण्याची टाकी डोंगराच्या पायथ्याशी असून तेथे दीडशे घरांची लोकवस्ती असल्याने ह्या सर्वांचा जीव धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गंभीर प्रकरणी प्रशासनाने कोणती दखल घेतली आहे वा घेण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर पाण्याची टाकी जमिनीवर उभी असून या टाकीच्या झाकणाचा स्लॅब दि. २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी कोसळला, हे खरे आहे.
(२) सदर पाण्याच्या टाकीची मान्यताप्राप्त आरसीसी कन्स्लटंट यांच्याकडून तपासणी करण्यात आली असून त्यांच्या अहवालानुसार सदर टाकीच्या भिंती सुस्थितीत आहेत, त्यामुळे पाण्याची टाकी कोसळण्याची शक्यता नाही.
(३) व (४) सदर टाकीच्या भिंती सुस्थितीत असल्याने तेथील नागरीकांच्या जिवितांस धोका उद्‌भवेल अशी वस्तुस्थिती नाही.

याशिवाय खबरदारीचा उपाय म्हणून सदरच्या टाकीचा संरक्षक भिंत बांधण्याकरीता नगरपरिषदेने निविदा मागविल्या असून संरक्षक भिंतीचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

-----------------

## मुंबई शहरामध्ये गिरणी कामगारांसाठी म्हाडाने नियोजित केलेल्या ८ हजार घरांचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * २९८१४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरामध्ये महापालिकेच्या विकास आराखडयातील चुकीच्या धोरणामुळे गिरणी कामगारांसाठी म्हाडाने नियोजित केलेल्या ८ हजार घरांचा प्रकल्प प्रलंबित असल्याची माहिती दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडिया समुहाने गिरणी कामगारांच्या घरांसाठी वडाळयात ४ एकर जमीन दिली परंतु महापालिकेच्या विकास आराखडयात या जमिनीवर विविध आरक्षणे टाकण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गिरणी कामगारांच्या घरांचा नियोजित प्रकल्प मार्गी लावण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. २५.०२.२०१५ रोजी प्रकाशित केलेल्या प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये वडाळा येथील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रकल्पासाठी म्हाडाला हस्तांतरित करण्यात येणाऱ्या जमिनीचा भाग पुनर्वसन व पुनर्वसाहत (Rehabilitation and Resettlement) म्हणून आरक्षित करण्यात आला आहे.

वडाळयाच्या जमिनीसंदर्भात अभिन्यासामध्ये झालेल्या फेरबदलाचा अंतर्भाव सुधारित प्रारुप विकास आराखडा - २०३४ मध्ये झालेला नसल्याने जागा आरक्षित झालेली आहे.

(३), (४) व (५) शासनाने दिनांक २३.०४.२०१५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये प्रारुप विकास आराखड्यामधील चुकांची दुरुस्ती करुन महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने प्रारुप विकास आराखडा नागरिकांच्या सूचना/ हरकतीसाठी पुन:प्रसिध्द करणेचे निर्देश दिलेले आहेत. प्रारुप विकास योजना पुर्नप्रसिध्द करण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रस्तूत प्रकरणी झालेली चूक महानगरपालिकेकडून दुरुस्त होणार आहे.

-----------------

## मुंबईतील मुलुंडजवळील पूर्व द्रुतगती महामार्गावर झालेला अपघात

**(२९) * २९५९२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंडजवळील पूर्व द्रुतगती महामार्गावरील अपघातानंतर तेलाच्या

टँकरने पेट घेतल्याने टँकरचालक व क्लिनरचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती शासनाने अपघातांत मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अपघात टँकर चालकाच्या निष्काळजीपणामुळे घडला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने मृत टँकर चालकाविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६७/१५ भा.दं.वि.सं. कलम २७९, ३०४ (अ) सह मो.वा.हा. कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना नैसर्गिक आपत्तीत येत नसल्याने मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देय नसल्याने आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडेखोळवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथे रेव्ह पार्टीत कर्नाटक मंत्रालयातील अधिकारी तसेच इतर सात जणांना झालेली अटक

**(३०) * २९३५० डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडेखोळवाडी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील जंगलातील फार्म हाऊसवर रेव्ह पार्टीत कर्नाटकातील एका मंत्र्यांचे खासगी स्वीय सहाय्यक, कर्नाटक मंत्रालयातील दोन वरीष्ठ अधिकारी, तीन कॉन्ट्रक्टर आणि एक व्यापारी असे सात जण मद्यधुंद स्थितीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास पोलीसांच्या छाप्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) या प्रकरणी पन्हाळा पोलीस ठाणे भाग-५, गु.र.नं ७९/२०१५ भा.दं.वि.सं. कलम ३७० सह आय.टी.पी.सन १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ सह मुं.दा.का. कलम ६६(१)(ब), ६८(अ) (ब) अन्वये दिनांक ०९.०८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर रेव्ह पार्टीच्या ठिकाणी पोलीसांनी धाड टाकून १० आरोपींना अटक करण्यात आली असून सबळ पुरावा सापडल्यामुळे त्यांचेविरुध्द मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

प्रकरणी अटक करण्यात आलेल्या १० आरोपींपैकी ३ आरोपी हे कर्नाटक मंत्रालयातील कर्मचारी आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर शहरात महानगरपालिकेची परवानगी न घेताच रिलायन्स जिओ कंपनीने उभारलेल्या टॉवरबाबत

**(३१) * ३८२८३ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर महानगरपालिकेची परवानगी न घेताच रिलायन्स जिओ कंपनीने लातूर शहरात ४-जी चे ३० केबल टॉवर्स उभारले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची दखल घेत महानगरपालिका आयुक्तांनी अनधिकृत टॉवर्सची चौकशी करुन कंपनीसह घरमालकांवर गुन्हे नोंदविण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दोषी कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लातूर महानगरपालिकेची परवानगी न घेता रिलायन्स जिओ कंपनीने लातूर शहरात ४ जी चे १९ केबल टॉवर्स उभारले आहेत. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. याबाबत नियमानुसार कार्यवाही  करण्याचे निर्देश आयुक्तानी दिले आहेत.

(३) मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २०४३/२०१४ मधील दिनांक १२.९.२०१४ च्या आदेशान्वये, मोबाईल टॉवर्सच्या जागा सीलबंद करणे आणि विजेचा पुरवठा खंडीत करणे यासाठी कोणताही बळाचा वापर करु नये तसेच मोबाईल टॉवर्सच्या जागा सीलबंद अथवा विद्युत पुरवठा खंडीत केले असल्यास ते तात्काळ पूर्ववत करुन देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे याबाबत शासनाने कंपनीवर कार्यवाही केलेली नाही.

- दरम्यानच्या कालावधीत सदर कंपनीने परवानगी शिवाय उभारलेले १९ टॉवर्स व  नवीन २ टॉवर्स  असे एकूण २१ टॉवर्सना परवानगी देण्याची महानगरपालिकेकडे विनंती केली आहे. त्याबाबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास कंपनीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या घंटागाडीतील फायबर डब्याच्या खरेदीमध्ये लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(३२) * ३५४६४ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या घंटागाडीतील फायबर डब्याच्या खरेदीमध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)  हे खरे नाही.

तथापि, स्थानिक वर्तमानपत्रात फायबर डबे प्रभाग निहाय वाटप करताना अनियमितता झाल्याच्या आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

घंटागाडयातील फायबरचे जूने डबे खराब झाल्यामुळे विभागाच्या मागणीनुसार किमान ५०० फायबर डब्यांच्या खरेदीकरीता बाजारामधून समक्ष चौकशी करुन दरपत्रक मागविण्यात आली होती.

त्यातील सर्वात कमी एका फायबर डब्याचा दर रु. २७००/- इतका होता. त्या दरानुसार ५०० डब्यांच्या खरेदीकरीता रु. १३.५० लक्ष इतका खर्च अपेक्षित होता.

त्यानुसार आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांच्या कायदेशीर अधिकारात निविदा मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत केवळ एकच निविदा प्राप्त झाली. या अल्प प्रतिसादामुळे या कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती.

तद्नंतर दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी एक अपात्र ठरल्याने न्यु साई फायबर यांची निविदा वाटाघाटीनंतर अंदाजपत्रकीय दराने प्रति फायबर डबा रु. २७००/- प्रमाणे एकूण ५०० डब्यांची रु. १३.५० लक्ष इतक्या किंमतीस खरेदी करण्यात आली आहे.

(२) या खरेदीत घोटाळा झाला नसल्याने चौकशी करण्यात आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर, मोहाडी (जि.भंडारा) येथील गृहनिर्माण योजनेतून गरजू व गरीब लोकांना घरे मिळणेबाबत

**(३३) * ३९१६३ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील गरजू व गरीब लोकांना शासनातर्फे म्हाडा गृहनिर्माण योजनेचा लाभ मिळणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुमसर व मोहाडी या तालुक्यात तालुकास्तरीय गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२), (३) व (४) भंडारा जिल्हयात भंडारा शहरात नागपूर मंडळाचे ताब्यात असलेल्या जमीनीवर नागपूर मंडळाने गृहनिर्माण योजना राबविल्या असून काही योजना प्रस्तावित आहेत. तथापि सद्य:स्थितीत म्हाडा, नागपूर मंडळाकडे भंडारा जिल्हयातील तालुक्याचे ठिकाणी कोणतीही शासकीय अथवा खाजगी जमीन उपलब्ध नाही. भंडारा जिल्हयात तालुक्याचे ठिकाणी जमीन उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात म्हाडाकडून संबंधित सरकारी यंत्रणाकडे पाठपुरावा करण्यात येत असून जमीन मिळताच नागपूर मंडळातर्फे योजना राबविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अंधेरी लोखंडवाला सर्कल जवळील स्वातंत्र्य सैनिकांच्या कोटयामधून मिळालेली सदनिका म्हाडाच्या परवानगीशिवाय विकल्याबाबत

**(३४) * ३३५६८ श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी लोखंडवाला सर्कल जवळील सदनिका क्र. ६ (अ) १००६ ही स्वातंत्र सैनिकाच्या कोटयामधून मिळालेली सदनिका त्यांचे वारस श्री.अशोक सुर्यवंशी यांना मृत दर्शवून परस्पर सलिम देसाई या संशयास्पद व्यक्तीला विकल्याबाबत चौकशी करुन दोषी व्यक्तीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत तसेच मुळ मालक श्री.अशोक सुर्यवंशी यांना सदनिका हस्तांतरीत करण्याबाबत धुळयाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी व तद्नंतरही वारंवार मा. गृहनिर्माण मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार दोषी व्यक्तीविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे तसेच उक्त सदनिका मुळ मालकांना हस्तांतरित करण्यात आली आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) व (३) मा.श्री.अनिल गोटे, विधानसभा सदस्य यांचे यासंदर्भातील दि. ३.२.२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.

उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार श्री.अशोक गगन सुर्यवंशी यांना म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत स्वातंत्र्य सैनिक राखीव प्रवर्गातून स्वातंत्र सैनिकांचे वारस/अवलंबून असणारे व्यक्ती म्हणून सन २०१० मध्ये अंधेरी लोखंडवाला सर्कलजवळील सदनिका क्र.६ (अ) १००६ ही सदनिका दि.२५.०२.२०१० रोजी वितरीत करण्यात आली होती. श्री.सुर्यवंशी यांनी सदर सदनिकेचा ताबा दि.२५.०२.२०१० रोजी घेतला. तद्नंतर सदर सदनिकेमध्ये श्री.सलिम महम्मद अली देसाई हे राहत असल्याची तक्रार म्हाडाकडे प्राप्त झाली. त्याअनुषंगाने श्री.अशोक सुर्यवंशी यांच्याकडे सदर गाळा मुंबई मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय श्री.सलिम देसाई यांना भाड्याने दिल्याबाबत म्हाडाकडून विचारणा करण्यात आली व त्यानुषंगाने मंडळाची रितसर परवानगी घेण्यासही त्यांना कळविण्यात आले.

मा.आमदार श्री.अनिल गोटे यांनी या संदर्भात दि.०३.०२.२०१५ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडाने केलेल्या गाळा तपासणीच्यावेळी सदर गाळ्यात श्री.सलिम देसाई यांचे वास्तव्य आढळून आल्याने प्राधिकरणाच्या विधीसल्लागार यांचे अभिप्राय घेऊन हे प्रकरण सक्षम प्राधिकारी, प्राधिकरण यांच्याकडे म्हाड अधिनियम, १९७६ च्या कलम ६६ अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. सक्षम प्राधिकारी यांचा निर्णय अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्णय/आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची तजवीज म्हाडा प्राधिकरणाने ठेवलेली आहे.

-----------------

## उल्हासनगर शहरामध्ये गुन्हे दाखल होऊनही अनधिकृत बांधकामे सुरू असल्याबाबत

**(३५) * ३९०९६ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरामध्ये गत चार वर्षामध्ये तब्बल १५०० अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करून महानगरपालिकेने सुमारे १६ जणांवर एम.आर.टी.पी कायदा अंतर्गत कारवाई केली परंतु गुन्हे दाखल होऊनही ९ टक्के बांधकामे सुरूच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सन २०११ ते २०१४ च्या दरम्यान प्रभाग समिती अंतर्गत असलेली अनिधिकृत बांधकामे पडून टाकण्याची कारवाई झाली असताना महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे यातील ५० टक्के बांधकामे पुन्हा उभी

राहल्याने अतिक्रम विभाग व प्रभाग समिती वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या महासभेत अनिधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी आवाज उठविल्यानंतर महानगरपालिकेने तातडीने कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले होते, परंतू सदर बांधकामे पुन्हा उभी राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनिधिकृत बांधकाम करण्यांचे पद रद्द करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावा अशी मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०११ ते १० डिसेंबर, २०१५ या कालावधीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने सुमारे ९७६ अनधिकृत बांधकामे निष्कसित केली असून, आतापर्यंत अनधिकृत बांधकाम करणाऱ्या ९८ संबंधितांवर एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. तथापि, अनधिकृत बांधकामे निष्कासित केल्यानंतरही सदर बांधकामे संबंधित करीत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.

(२) निष्कासित केलेल्या बांधकामापैकी काही बांधकामे पुन्हा बांधण्यात येतात हे खरे आहे. तथापि अशा अनधिकृत बांधकामांवर वेळोवेळी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येते.

(३) उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेत अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार दिनांक ०१.१०.२०१५ पासून महानगरपालिकेने विशेष मोहिम घेऊन ६४००० चौ. फुटाची ४१ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर महापालिकेमार्फत नियमानुसार एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात येतात. तसेच आतापर्यंत सुमारे ९८ अनधिकृत बांधकाम धारकांवर एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील महिला बचत गटांना हक्काची**
**बाजारपेठ उपलब्ध होण्याबाबत**

**(३६) * ३०४८५ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत मोठया संख्येने महिला बचत गट कार्यरत असून त्यांनी उत्पादित केलेल्या मालास हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी नवी मुंबईत विभागनिहाय केंद्राची उभारणी करण्याकरीता सिडकोने भूखंड उपलब्ध करुन द्यावेत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने भूखंड उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नवी मुंबई महानगरपालिकेकडून विविध सामाजिक उपक्रमांसाठी भूखंड वाटप करण्याची मागणी प्राप्त झाल्यानुसार सिडकोने संचालक मंडळ व शासनमान्य मूल्य

आकारणी धोरणानुसार, नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारीत) विनियम, २००८ अन्वये भाडेपट्टयाचा सवलतीचा दर आकारुन विविध समाज कल्याणकारी उपक्रमाकरीता २५ व शालेय उपक्रमाकरीता १८ भूखंडाचे वाटप महानगरपालिकेस करण्यात आले आहे.

उक्त २५ भूखंडापैकी घणसोली व कोपरखैरणे येथे प्रत्येकी एक असे दोन भूखंड सिडकोने नवी मुंबई महानगरपालिकेस महिला बचत गटासाठी वाटप केले आहेत.

तसेच नवी मुंबई महानगरपालिकेस समाजकल्याणकारी उपक्रमासाठी १४ भूखंडाचे वाटप प्रस्तावित असून त्यापैकी एक भूखंड महिला बचतगटासाठी आरेखित केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

### पुणे महानगरपालिका हद्दीतील नाल्यांवरील अनाधिकृत बांधकामाबाबत

**(३७) * ३८५६० श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील २७ नाल्यांचा सर्व्हे करून अहवाल माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये शहर सुधारणा समिती समोर सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिका हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांच्या फायद्यासाठी हे नाले वळवण्यात आल्याबाबत शहर सुधारणा समिती व मुख्यसभेमध्ये प्रस्ताव मांडला जाऊन त्यावर चर्चा झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिका हद्दीतील नाल्याची एकूण संख्या किती आहे तसेच किती बांधकामे नाल्यावर किंवा नाल्याचा प्रवाह वळवून करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेकडून माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये २७ नाल्यांचा सर्व्हे करण्यात आला असून, माहे फेब्रुवारी, २०१४ मध्येच त्यावर शहर सुधारणा समितीमध्ये चर्चा झाली होती.

(२) पुणे शहरातील नाले वळविण्यासंदर्भात शहर सुधारणा समितीमध्ये २७ नाल्यांच्या अनुषंगाने चर्चा झाल्यानुसार विकास नियंत्रण नियमावली मधील कलम ११.१ ब मधील नाल्यांच्या अलायमेंट मध्ये बदल करण्याची तरतुद रद्द करण्याबाबत शहर सुधारण समितीने ठराव क्र. २२०, दिनांक ७.२.२०१४ रोजी संमत केला आहे. त्यानुसार महासभेने ठराव क्र. ३६, दिनांक २०.५.२०१४ रोजी पारित केला आहे.

(३) पुणे शहर महानगरपालिका हद्दीतील नाल्याचे सर्व्हेक्षणाचे काम प्रायमुव्ह या खाजगी संस्थेकडून करण्यात आले असून, त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार पुणे शहरामधील नाले व उप नाल्यांची संख्या २३४ इतकी आहे. या नाल्यांची एकूण लांबी अंदाजे ३६२ कि.मी असून, त्यापैकी सुमारे १५ कि.मी. वर संपूर्णपणे अडथळे असून सुमारे ५० कि.मी लांबीवर अंशत: अडथळे असल्याचे सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सन १९९७ मध्ये २३ गावे पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट होण्यापूर्वी नाल्यांवर अनेक ठिकाणी मोठया प्रमाणावर अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, गुंठेवारी सदृश विकास, झोपडपट्या इ. स्वरुपाची कामे झालेली आहेत. तसेच प्रायमूव्ह अहवाल सादर होण्यापूर्वी पुणे शहराच्या जुन्या हद्दीतून वाहणाऱ्या नाल्यांवर देखील वर नमूद केल्याप्रमाणे अतिक्रमणे झालेली आहेत.

विकास नियंत्रण नियमावली मधील कलम ११.१ ब नुसार काही मिळकतीमध्ये विकसनाची परवानगी देताना सदर तरतुदीचे आधारे नाला वळविण्यास परवानग्या देण्यात आल्या आहेत. मात्र प्रायमूव्ह संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यापासून विकसनाच्या परवानग्या काटेकोरपणे सदर अहवालानुसार देण्यात येत आहेत.

(४) प्रायमूव्ह अहवालात एकूण २३ नाला बेसिन निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी ४ बेसिन्सची कामे हाती घेण्यात येऊन पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच जवाहरलाल नेहरु नागरी पुनरत्थान योजने अंतर्गत ६ नाला बेसिन्सच्या कामांना मंजुरी मिळालेली असून, सदर कामे लवकरच हाती घेण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये आवश्यक ती तरतूद करुन उर्वरित १३ नाला बेसिन्सची कामे हाती घेणे नियोजित आहे. सदर सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर पुणे शहरामधील सर्व नाल्यांचा प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

नाल्याचा प्रवाह वळविणे व त्यावरील बांधकामे/अतिक्रमणे याबाबत सखोल चौकशी करुन स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील टेक्सन कंपनीच्या कामगारांची देणी मिळण्याबाबत

**(३८) * ३२२७८ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील टेक्सन कंपनीने सन १९८१ ते २०१५ दरम्यान ब-याच कामगारांना कामावरुन कमी करुन त्यांना रोजगारापासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्यायग्रस्त कामगारांनी कामगार न्यायालयात धाव घेतली असता कामगारांना कामावर घेण्याचे व मागील पगार देण्याचे कामगार न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप सदर कामगारांना कामावर घेण्याच्या व मागील पगार देण्याचे कामगार न्यायालयाचे आदेशाचे पालन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त कंपनीचे मालक व व्यवस्थापक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच कामगारांना कामावर घेण्याबाबत व नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) कामगारांनी दि. ११ मे, १९८१ पासून सुरु केलेला संप मागे घेऊन व्यवस्थापनाने त्यांना (निलंबित केलेले कामगार वगळून) कामावर रुजू करुन घ्यावे अशा प्रकारचे आदेश मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दि. ११ ऑगस्ट १९८६ रोजी पारित केलेले होते. या आदेशांविरुध्द कामगार संघटनेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ४६३९/१९८६ दाखल केली होती. या याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि. २३.१०.१९८६ रोजी औद्योगिक न्यायालय जो वाढीव कालावधी देईल त्या कालावधीमध्ये कामगारांना हजर करुन घ्यावे असे आदेश दिले. त्यानुसार औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दि. ०९.०१.१९८७ रोजी असे आदेश पारित केले की, कामगारांना १९.०१.१९८७ पर्यंत व्यवस्थापनाने कामावर रुजू करुन घ्यावे. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २५८०/१९८७ मध्ये दि. ०९.०१.१९८७ चे औद्योगिक न्यायालयाचे आदेश दि. ०३.१२.१९८७ रोजी रद्द बातल ठरविले. तद्नंतर कामगार दि. ०४.१२.१९८७ रोजी कामावर हजर होण्यासाठी गेले असता व्यवस्थापनाने त्यांना हमीपत्र न दिल्यामुळे कामावर हजर करुन घेतले नाही.

(२) मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी तक्रार युएलपी क्र. ४५९/१९८७ मध्ये दि. २८.१०.१९९३ रोजी असा निर्णय दिला आहे की, ज्या कामगारांनी दि. १२.१०.१९९० रोजीच्या करारानुसार राजीनामा दिला नाही त्या कामगारांना कामावर घेण्याबाबत व त्यांचे पगार देण्याबाबत आदेशित केले आहे.

(३) मा. औद्योगिक न्यायालयाच्या दि. २८.१०.१९९३ च्या अन्वयार्थाबाबत कामगार व व्यवस्थापन यांच्या भूमिका परस्परविरोधी आहेत. कामगारांनी राजीनामा दिला आहे अशी भूमिका घेऊन व्यवस्थापन कामगारांस कामावर रुजू करुन घेत नाही, ही व्यवस्थापनाची भूमिका कामगारांना मान्य नसल्याने त्यांनी याबाबत मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे तक्रार क्र. १५१/१९९४ व संकिर्ण तक्रारी क्र. १२/२००० ते ३३/२००० (२२ तक्रारी) दाखल केलेल्या होत्या. सदरहू सर्व तक्रारी मा. औद्योगिक न्यायालयाने दि. १०.०२.२००३ च्या आदेशान्वये नामंजूर केल्या मा. औद्योगिक न्यायालयाच्या दि. २८.१०.१९९३ च्या आदेशाविरुध्द, २२ कामगारांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ६४४८/२००३ दाखल केली असून ती सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(४) १९८१ साली उद्भवलेल्या विवादामध्ये कामगार/ कामगार संघटना व व्यवस्थापनाने न्यायिक प्रक्रियेचा अवलंब केलेला असून त्यामधील विविध निर्णय व त्याचे अन्वयार्थ, ही बाब हा न्याय प्रक्रियेचाच भाग असल्याने हे प्रकरण सद्य:स्थितीत मा. उच्च न्यायालयासमोर न्यायप्रविष्ट आहे.

व्यवस्थापनाचा कामगार कपातीचा अर्ज शासनाने दि. १३.०१.१९८७ रोजी नाकारलेला आहे. विवादात मार्ग काढण्यासाठी शासन व कामगार कार्यालयाच्या स्तरावर १९८१ व १९८५ च्या दरम्यान बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या, परंतु त्यामध्ये मार्ग निघू शकला नाही.

(५) मा. उच्च न्यालयासमोर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## विलेपार्ले (मुंबई) येथील 'जय माता दी' एअर कुरीअर कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे झालेले अपहरण

**(३९) * ३३४६२ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विलेपार्ले (मुंबई) पूर्व विमानतळाजवळील मार्गावर 'जय माता दी' एअर कुरीअर कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास अपहरण करुन त्यांच्याकडील २ कोटी ८८ लाख रुपयांचे दागिने दिवसा ढवळ्या लुटण्यात आल्याबाबतची तक्रार वांद्रे पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यापूर्वी सदर कुरीअर कंपनी संदर्भात अशा प्रकारे लुटण्याच्या चार घटना घडल्या असून या संपूर्ण प्रकरणांचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत विलेपार्ले पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३३७/१५ भा.द.वि.स. कलम १७०, ३४१, ३९५, ३६३, २०१, ४१२, ४६८, सह कलम ३,२५ भाहका अन्वये दिनांक २१.१०.२०१५ रोजी दाखल आहे.
(२) उपरोक्त गुन्ह्यात एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांचेकडून चोरीस गेलेली संपूर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. सदरचा गुन्हा तपसाधीन आहे.

उपरोक्त गुन्ह्याव्यतिरिक्त यापुर्वी सदर कुरिअर कंपनीच्या लुटीच्या घटनेबाबत विलेपार्ले पोलीस स्थानकाच्या अभिलेखी गुन्हा नोंद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची शालेय इमारत, कार्यशाळा व मुलांच्या वसतीगृहाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(४०) * २८७२५ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची शालेय इमारत, कार्यशाळा व मुलांच्या वसतीगृहाच्या इमारतीची अतिशय दुरवस्था झाली असून देखभाल दुरुस्तीची मागणी आयटीआय मधील विद्यार्थ्यांनी प्राचार्यांकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्या सुमारास मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने अनेकदा आवश्यक निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी अभावी उक्त शिक्षण संस्थेची दयनीय अवस्था झाली असून, याबाबत चौकशी करून आवश्यक निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) खरे नाही.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागास इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन अंदाजपत्रक सादर करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक प्राप्त झालेले नाही. अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील दिघा येथे बेकायदेशीर बांधकाम करणा-या विकासकांवर कारवाई करणेबाबत

**(४१) * ३२०७४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथील दिघा येथे बेकायदेशीर बांधकाम करणा-या विकासकांविरोधात रहिवाशांनी केलेल्या तक्रारीनंतर रबाळे येथील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुन्हे दाखल करण्यात आलेले विकासक तसेच त्यांच्या कंपन्यांची नावे काय आहे व त्यांनी किती इमारती बांधून, किती नागरिकांची, किती रुपयांची फसवणूक केल्याची बाब तपासात उघडकीस आली असून सदर तपास करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर बेकायदेशीर इमारतींना बांधकाम परवाना, वीज, पाणी इत्यादी कनेक्शन देणाऱ्या व त्यांच्याकडून कर वसूल करणाऱ्या संबधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात तसेच सदर ठिकाणी बांधकाम करणाऱ्या परंतु पोलीसांत तक्रार दाखल न झालेल्या विकासकांविरोधात गुन्हे दाखल करण्याकरिता व त्यांना अटक करण्याकरिता शासनामार्फत काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) गुन्हे दाखल करण्यात आलेल्या विकासकांची नावे व कंपन्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:-

१) एकविरा आई डेव्हलपर्स, विकासक श्री. खारकर, श्री. मोकाशी व श्री. मढवी, शिवराम अपार्टमेंट, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या ३२ असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २१३/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार फसवणुकीची रक्कम रु. १,०४,०८,०००/- आढळून आली आहे.
२) अष्टविनायक कंस्ट्रक्शन प्रा.लि. विकासक श्री.पाटील, श्री. खारकर, श्री. खंदे, केरु प्लाझा अपार्टमेंट, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या ४९ असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २१४/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार फसवणुकीची रक्कम रु. १,५८,३६,५००/- आढळून आली आहे.
३) एकविरा आई डेव्हलपर्स, विकासक श्री. खारकर, श्री. कोळी, श्री. मोकाशी, पांडुरंग अपार्टमेंट, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या १८ असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २२०/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार फसवणुकीची रक्कम रु. ८५,७८,०००/- आढळून आली आहे.
४) एम के डेव्हलपर्स, विकासक श्री. नविन गवते, श्री. राजेश गवते, मोरेश्वर अपार्टमेंट व शिमग्या अपार्टमेंट, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या अनुक्रमे १४ व ८० असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २२९/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार दोन साक्षीदारांची रक्कम निष्पन्न झाली असून ती रु. १६,६७,०००/- आढळून आली आहे.

५) मे. भोलानाथ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, विकासक श्री. ठाकुर, जय गणेश भवनबिल्डींग, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या ४५ असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २३०/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार एका साक्षीदाराची रक्कम निष्पन्न झाली असून ती रु. ५,००,०००/- आढळून आली आहे.

६) गणेश बिल्डर्स अँड. डेव्हलपर्स, विकासक श्री. हरसोरा, अमृतनगर हाऊस कॉम्प्लेक्स, दिघा या इमारती बांधलेल्या असून फसवणूक केलेल्या नागरिकांची संख्या ४३ असून पोलीस स्टेशन, रबाळे येथे गु.र.क्र. २३१/२०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार एका साक्षीदाराची रक्कम निष्पन्न झाली असून ती रु.२,४३,०००/- आढळून आली आहे.

(३) मा. उच्च न्यायालय येथे दाखल असलेल्या पीआयएल क्र. १३८/२०१२ व ८०/२०१३ च्या अनुषंगाने न्यायालयात उप विभागीय अधिकारी, ठाणे, विभाग ठाणे यांनी ९९ अनधिकृत इमारतींपैकी ०४ सिडकोच्या अखत्यारीतील, ९० इमारती एमआयडीसी च्या अखत्यारीतील व इतर ०५ इमारती कोणत्या ठिकाणी आहेत, याबाबत सविस्तर अहवाल सादर केला आहे.

या प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या क्षेत्रासाठी एमआरटीपी कायद्यान्वये ही प्राधिकरणे नियोजन प्राधिकरणे म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या अखत्यारीतील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचा व निष्कासीत करण्याचा एमआरटीपी ॲक्ट १९६६ अन्वये त्यांना अधिकार असल्यामुळे त्याबाबत त्यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

न्यायालयाच्या आदेशन्वये शिवराम अपार्टमेंट व केरु प्लाझा या इमारती तोडण्यात आल्या आहेत, पांडुरंग अपार्टमेंटच्या रहिवाशांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. २७८३४/२०१५ दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

बेकायदेशीर बांधकामांना परवाना, विज, पाणी इ. कनेक्शन देणाऱ्या कार्यालयाकडे चौकशी चालू असून या गुन्ह्यात ज्यांचा सहभाग असेल त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची तरतूद ठेवली आहे.

मा. उच्च न्यायालयाने अनधिकृत बांधकामाबाबत कायदेशीर कारवाई करण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस आयुक्त, वाशी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

बेकायदेशीर असलेल्या इमारतीतील रहिवाशांनी संबंधित विकासकाविरुध्द तक्रार करावी. याबाबत पोलीसांकडून आवाहन करण्यात आले आहे. या अनुषंगाने तक्रारी दाखल होताच योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वरळी येथील पोलीस वसाहतीतील इमारती रहाण्याकरिता धोकादायक असल्याबाबत**

**(४२) * ३१७८० श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील पोलीस वसाहतीतील इमारतींच्या भिंतींना तडे गेले असून तुटलेल्या फरश्या आणि खचलेले मजले अशा धोकादायक इमारतीत पोलीसांची १०८ कुटुंबे जीव मुठीत धरुन रहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास वरळीच्या जुन्या पोलीस वसाहतीतील सी पध्दतीच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या कॉन्स्टेबल श्री. रवींद्र दळवी यांच्या घरातील स्लॅबचा ८० टक्के भाग दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळून त्यात १४ वर्षाची मुलगी गंभीर जखमी झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीतील रहिवाशांचे तातडीने स्थलांतर करुन पोलीस वसाहतींची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) वरळीच्या पोलीस वसाहतीमधील श्री.रविंद्र दळवी यांच्या निवासस्थानामधील स्लॅबचे प्लॅस्टर कोसळल्याने त्यांच्या मुलीला दुखापत झाली असून ४ टाके पडलेले आहेत. या घटनेनंतर त्यांना दुसरे शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आले आहे.

(३) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७.११.२०१५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार वरळी येथील धोकादायक स्थितीमध्ये असलेल्या व इतर इमारतींच्या दुरुस्तीचा/पुर्नबांधणीचा प्रस्ताव फेरसादर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे. तसेच धोकादायक इमारतीमधील रहिवाश्यांना त्वरीत पर्यायी व्यवस्था करुन अन्यत्र हलविण्यासाठी आणि या ठिकाणी बांधलेल्या नविन इमारतीमधील सदनिकांचे वाटप अनुज्ञेयता तपासून प्राथम्याने करण्याकरीता पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

तसेच पोलीस विभागाच्या वरळी येथील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासांतर्गत ४ चटईक्षेत्र (एफएसआय) देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महापालिकेतील सिग्नल जंक्शन दुरुस्तीच्या कामात**
**सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४३) * ३६८५२ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेतील सिग्नल जंक्शन दुरुस्तीच्या कामात सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारची बातमी दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

तसेच मुंबई महापालिकेतील सिग्नल जंक्शन दुरुस्तीच्या कामाबाबत माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने मुख्य माहिती आयुक्तांकडे झालेल्या सुनावणी दरम्यान, अपीलकर्त्याने या कामात कंत्राटदाराने काँक्रिट आणि डेब्रिज चार्जेस भरलेले नसल्यामुळे सुमारे ३०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे असे प्रतिपादन केले होते.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जंक्शन दुरुस्तीच्या कामात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयातील वर्तकनगर येथील भाडे तत्वावर (रेंटल) हौसिंग योजनेतील ४० दुकाने गत चार वर्षापासून बंद असल्याबाबत

**(४४) * ३९३३६ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील वर्तकनगर येथील भाडे तत्वावर (रेंटल) हौसिंग योजनेतील उपलब्ध असलेली ४० दुकाने गत चार वर्षे बंद असल्याने सदर गाळे भाडे तत्वावर महिला बचत गटांना देण्याबाबतची मागणी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेतील गाळे वापराविना राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मागणीनुसार सदरहू गाळे भाडेतत्वावर देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण सदनिकांपैकी सर्वसाधारणपणे ५० टक्केपर्यंत सदनिका प्राधान्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारती निष्कासित करतांना विस्थापित होत असलेल्या रहिवाशांना तात्पुरत्या निवाऱ्यासाठी संक्रमण निवास म्हणून उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्याकरीता अवलंबविण्यात यावयाच्या कार्यपध्दतीबाबत आवश्यक ते निर्देश प्रशासनाकडून महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दि. २२/८/२०१३ च्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत प्राप्त दुकानगाळे वितरणाबाबत ठराव पारित केला आहे. भाडेतत्वावरील प्राप्त उर्वरित सदनिका तसेच दुकानभाडे वाटपाबाबतचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने मुक्त केलेल्या बाल भिक्षेक-यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४५) * २९८४८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने बाल भिक्षेक-यांना मुक्त करण्यासाठी हाती घेतलेल्या मोहिमेमध्ये दक्षिण मुंबई आणि उत्तर मुंबईत सर्वाधिक बाल भिक्षेक-यांची संख्या पोलिसांना आढळून आली असून मुंबईतील ४१६ बालकांची मुक्तता करण्यात पोलिसांना यश मिळाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुक्त केलेल्या बाल भिक्षेक-यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नोव्हेंबर २०१५ अखेरपर्यंत एकुण ४४३ बाल भिक्षेकऱ्यांची मुक्तता करण्यात आलेली आहे.

(२) मुक्त केलेल्यापैकी १३८ बाल भिक्षेकऱ्यांना बालगृह डोंगरी येथे व ३०५ बाल भिक्षेकऱ्यांना मानखुर्द येथील बालगृहात दाखल करण्यात येऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर उत्तर विभागातील अनुसूचित जातीच्या मुलांमुलीकरिता असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची झालेली दुरवस्था

**(४६) * ३६२१२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उत्तर विभागात अनुसूचित जातीच्या मुलांमुलीकरीता औद्योगीक प्रशिक्षण संस्थेची निर्मिती करण्यात आली असून संस्थेची निधीअभावी व शासनाच्या उदासीनतेमुळे दुरावस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षापासून सदर संस्थेमधील यंत्र सामुग्री वापराविना असल्याने निकामी होण्याच्या मार्गावर असून त्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या संस्थेचा विस्ताराची योजना आखली आहे काय, तसेच संस्था चालू करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) १२ व्यवसायाऐवजी फक्त ०६ व्यवसायाच्या प्रत्येकी ०२ तुकड्या सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४७) * ३०३९६ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.के.सी. पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली शहरात वाढलेल्या गुन्ह्यांच्या पार्श्वभुमीवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव गत ३ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात तत्कालीन आयुक्तांनी सीसीटीव्ही कॅमे-यासाठी १ कोटी रुपयाची तरतूद केली होती परंतु शहरात कोणत्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत यासंबंधीचे सर्वेक्षण पोलिसांकडून करण्यात आले नसल्याने तसेच सदर कॅमेरे बसविल्यानंतर त्यांची देखभाल दुरुस्ती कोणी करावयाची याबाबतचा निर्णय न झाल्याने काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात सी.सी.टी.व्ही प्रकल्पाकरीता तरतूद करण्यात आली नव्हती.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ७ पोलीस ठाण्यांतर्गत सी.सी.टी.व्ही बसविण्याबाबत पोलीस विभागाकडून सर्वेक्षण करण्यात येऊन त्याची यादी महानगरपालिकेस सादर करण्यात आली.

सदर प्रयोजनाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत, तसेच उक्त प्रकल्पाच्या कामाच्या व्याप्तीसंबंधी महानगरपालिकेने पाठविलेल्या प्रस्तावास राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने (माहिती तंत्रज्ञान कक्ष) दि. ०३.०९.२०१४ च्या पत्राद्वारे स्विकृती दिली.

तद्नंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून या प्रकल्पाकरीता मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन समंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिकेकडून या समंत्रकास दि. २८/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिरुर (जि. पुणे) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४८) * ३०४७६ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि. पुणे) येथील ब्रिटीशकालीन पोलीस वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाली असून सर्वत्र अस्वच्छता पसरली आहे तसेच कारवाई मध्ये जप्त केलेल्या वाहनांचा देखील वसाहतीतच खच पडला आहे व संपूर्ण वसाहतीत एकच स्वच्छतागृह असल्याने वसाहतीत राहणाऱ्या पोलीसांच्या कुटुंबियांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीची दुरुस्ती करुन सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) शिरुर जि.पुणे येथील पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव व अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माहुली जहागीर (जि.अमरावती) येथे पोलिसांनी जमावावर केलेला गोळीबार**

**(४९) * २८६३४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुली जहागीर (जि.अमरावती) येथील विद्यार्थी बस अपघातात ठार झाल्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या जमावावर दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी बेछूटपणे गोळीबार करुन गावकऱ्यांना बेदम मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोळीबार करण्यापूर्वी पोलिसांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक असतानाही घेण्यात आलेली नाही तसेच पोलिस गावकऱ्यांवर सुड घेण्याच्या भावनेने वागत असून त्यांच्यावर बनावट गुन्हे दाखल करत

असल्याप्रकरणी दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यादरम्यान तेथील लोकप्रतिनीधी यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेवून माहिती दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) मा. विधानसभा सदस्य ॲड. यशोमती ठाकूर यांनी श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विरोधी पक्ष नेता यांनी शासनास लिहीलेल्या पत्राची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास दिली. सदर पत्रास २५.०८.२०१५ रोजी माहूली जहागीर ता.जि. अमरावती येथे घडलेल्या घटनेबाबत नमूद करण्यात आले होते.

(३) सदर प्रकरणी माहुली बस स्टॉपवर मोर्शी, बुलढाणा या बसने एका शाळकरी मुलाचा अपघात होऊन त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला त्यावेळी जमलेल्या जमावाने एस.टी. बसची तोडफोड सुरु केली व पोलीसांच्या कामात अडथळा आणून पोलीसांवर दगडफेक केली व एस.टी. बस ला आग लावली. तसेच सदर आग विझविण्यासाठी आलेल्या अग्निशामक दलाच्या गाडीला देखील आग लावली. पोलीसांनी जमावाला समजावण्याचा प्रयत्न केला असता, जमावाने दगडफेक केली व जमाव सतत दगडफेक करीत असल्याने व जीवघेणा हल्ला करीत असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांनी जमाव पांगविण्यासाठी व स्वसंरक्षणासाठी एक स्टन ग्रेनेट, २ डायमार्कर, ३ टीअर्स स्मोक सेल व ३ पी.ए.जी. कार्टेज यांचा वापर केला. जीवित व वित्त हानी टाळणे तसेच स्वसंरक्षण व कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक असल्याने वरील परिस्थिती लक्षात घेता पोलीसांनी संयम बाळगत टप्प्याटप्याने बळाचा वापर केला आहे.

जमावाने केलेल्या हल्ल्यामध्ये १ अधिकारी व ९ पोलीस कर्मचारी जखमी झाले व शासनाच्या मालमत्तेचे एकूण ५०,५४,५५०/- रुपयांचे नुकसान झाले.

अपघाताच्या घटनेबाबत पोलीस स्टेशन माहुली येथे गु.र.क्र.८७/१५ भादंवि कलम २७९, ३०४ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. एस.टी. चे वाहनचालक व वाहक यांना अटक करण्यात आली असून, तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दंगलीच्या घटनेबाबत पोलीस स्टेशन माहुली येथे गु.र.क्र.८८/१५ भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०७, ३९५, ४३५, ३३६, ३३७, ३५३, १०९, ११४,१८६, ३२२, ४२७, २९४, २०१ सा.मां.वि.कायदा सह कलम ३ क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्ट सह कलम ७ व मु.पो.का. १३५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्ह्याच्या तपासात ७३ आरोपी आढळून आले. त्यापैकी ३२ आरोपींना अटक करण्यात आली असून, २० आरोपींनी सत्र न्यायालयातून अटकपूर्व जामिन प्राप्त केला आहे, व ५ आरोपी फरार आहेत. एकूण ५७ आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असून १६ आरोपींविरुध्द पुरवणी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल होणे बाकी आहे.

तसेच पोलीस स्टेशन माहुली येथे गु.र.क्र. ८९/१५ भादंवि कलम १४५, १४७, १४८, १४९, ३५३, ३२४, ३३२, ३३६, ३३७, १८६ मुंबई पोलीस कायदा सह कलम ३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात ७९ आरोपींना अटक करण्यात आली असून १ आरोपी फरार आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून सर्व आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

मौजा माहुली जहागीर, ता.जि. अमरावती येथे दि.२५/०८/१५ रोजी घडलेल्या घटनेच्या दंडाधिकारीय चौकशीसाठी जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय दंडाधिकारी, अमरावती यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुहूगाव वाशी, नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकामावर महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याबाबत

**(५०) * ३६५९५ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. पार्थो दास यांनी सिडकोच्या हडप केलेल्या सेक्टर ११ जुहूगाव, वाशी, येथील जागेवर मरीन सेंटरच्या नावे जी +२ अनधिकृत बांधकाम करून व्यावसायिक वापर करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालकाला महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनामार्फत फक्त नोटीस देवून पाठीशी घातले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या तथाकथित बेकायदेशीर मालक श्री.पार्थो दास यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेने नोटीस बजावली आहे.

या अनधिकृत बांधकामाविरोधात सिडको प्रशासन आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत संयुक्त मोहीम हाती घेण्यात आली असून महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयामार्फत २४ तासांची नोटीस बजावून निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) अनधिकृत बांधकाम करणा-या संबंधितांविरोधात नवी मुंबई महानगर-पालिकेकडून गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकरदन (जि.जालना) शहरातील कचरा नगरपरिषद प्रशासनाकडून शहरालगतच्या केळना नदीच्या पात्रात टाकला जात असल्याबाबत

**(५१) * ३९२३७ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) शहरातील कचरा नगरपरिषद प्रशासनाकडून शहरालगतच्या केळना नदीच्या पात्रात टाकला जात असल्याने त्यापासून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी भोकरदन नगरपरिषदेकडे तक्रारी देवूनही यावर अद्यापपर्यंत पालिका प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील कळंबोली परिसरातील मथुर नाडर याने गुंगीचे औषध देऊन अल्पवयीन मुला-मुलींवर शारीरिक अत्याचार केल्याबाबत

**(५२) * २९९१५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील कळंबोली परिसरातील वडापाव व इडली विक्रेता मथुर नाडर याने ४० ते ५० अल्पवयीन मुला-मुलींना वडापाव व इडलीतून गुंगीचे औषध देऊन शारीरिक अत्याचार करुन भ्रमणध्वनीव्दारे त्याचे चित्रीकरण केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नराधमाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. याबाबत फिर्यादीवरुन कळंबोली पोलीस ठाणे येथे गु. र.नं. १२५/२०१५, भा.दं.वि.सं. कलम ३७६(१), ३७६(२)(एफ), ३७६(आय), ३७६(एन), ३७७, ३५४(ए)(बी)(सी), ५०६(१) सह दि प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फॉम सेक्शुअल ऑफेन्सेस ॲक्ट २०१२ चे कलम- ४,६,८,१२,१४, सह माहिती व तंत्रज्ञान कायदा कलम- ६६(ई), ६७, बी-बी,सी,ई प्रमाणे दिनांक ०९.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली असून आरोपी न्यायालयीन कस्टडीमध्ये आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईमधील रस्ते अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(५३) * ३५१७७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये जानेवारी ते जुलै, २०१५ दरम्यान १२ हजार ९९५ रस्ते अपघात झाले असून त्यापैकी २७७ अपघातांमध्ये २९२ जणांना प्राण गमवावे लागले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातांमध्ये २ हजार ४६८ जण जखमी झाले असून दिवसा २१३ व रात्री ६३ अपघात झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळा, महाविद्यालयात जनजागृती करण्याबरोबरच अनेक सामाजिक संस्थांना सोबत घेऊन पथ नाटयही सादर केले जात असूनही सगळे प्रयत्न अपयशी ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अपघातांमध्ये २७७ प्राणंतिक अपघात असून त्यापैकी २१३ अपघात दिवसा व ६४ अपघात रात्री झालेले आहेत. तसेच २०२६ अपघातांमध्ये २४६९ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

सन २०११ पासून मुंबई शहरातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी होत आहे.

| वर्ष | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ |
|---|---|---|---|---|
| अपघात | २५४७१ | २४५९२ | २३५९४ | २२५९९ |

(४) राज्यातील रस्ते अपघात रोखण्याकरिता मोटार वाहन चालकाची गुणवत्ता आणि कौशल्य वाढविणे, वाहनांच्या सुस्थितीबाबत योग्य चाचणी घेणे, वाहतुक नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, रस्त्यांचे योग्य आराखडे व पायाभूत सुविधा निर्माण करणे, रस्ता सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे आणि शासकीय व स्वयंसेवी संस्था यांचे सामुहिक प्रयत्न या बाबी शासनाकडून केल्या जात आहेत.

तसेच रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी दिनांक १४.१०.२०१५ रोजी शासनाने राज्य रस्ता सुरक्षा धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार रस्ते अपघातांस कारणीभूत घटक लक्षात घेवून कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कामवारी ते चाविंद्रा (ता.भिवंडी,जि.ठाणे) नदीपात्र बुजवून विकासकांनी टोलेजंग इमारती उभारल्याबाबत**

**(५४) * ३१५०० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहराला लागूनच असलेल्या कामवारी नदीपात्रातच अनेक नामवंत विकासकांनी सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन नदीनाला ते चाविंद्रा गावांदरम्यान नदीपात्र बुजवून टोलेजंग इमारती उभारल्या असून याबाबत तेथील नागरिकांनी गत दीड वर्षापासून जिल्हाधिकारी ठाणे, मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त कोकण विभाग आदींकडे लेखी तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीपात्रात मातीचा भराव टाकून इमारतींचे प्रचंड प्रमाणात अनधिकृत बांधकामे केल्यामुळे या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना सदरहू इमारती कोसळून मोठ्या प्रमाणात जिवितहानी होण्याची भिती निर्माण झाल्याचे सदरहू तक्रारीमध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीपात्रातच भराव टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले असून पावसाळ्यात येणाऱ्या पुराच्या पाण्याने शेलार, मीठपाडा, खोणी, काटई, चाविंद्रा, गोरसाई या गावांप्रमाणेच शहरातील नदीनाका, संगमपाडा, म्हाडा कॉलनी आदी भागातील रहिवाश्यांना बेघर व्हावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दिवसेंदिवस सीआरझेडचे उल्लंघन करुन उभारण्यात आलेल्या टोलेजंग इमारती निष्कासित करण्याच्या दृष्टीने तसेच सदरहू बांधकाम करणाऱ्या विकासकांच्या विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) तक्रारीमध्ये उक्त बाब नमुद केलेली आहे. हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

चाविंद्रा गावात पावसाळ्यामध्ये पुराचे पाणी सदरच्या गावामध्ये भरत नाही. तथापि, भिवंडी शहरातील नदीनाका, संगमपाडा, म्हाडा कॉलनी या भागात समुद्रास उच्चतम भरती आली व त्याचवेळी जास्तीचे पर्जन्यमान झाल्यास सदर नदीलगतच्या भागात बॅक वॉटरचे पाणी शिरुन दोन ते तीन तासासाठी पुर परिस्थिती निर्माण होते. सदरची पुरपरिस्थिती वर्षातुन दोन ते तीन वेळा पावसाळ्यात जास्त पर्जन्यमानाचे वेळीच निर्माण होते ही वस्तुस्थिती आहे.

शेलार येथील मिठपाडा या भागात रस्त्यालगतच्या सखल भागात पाणी साठते. तसेच खोणी येथील अकीम मस्जिद रोड (खड्डा) येथे नदी किनारी असलेल्या बैठ्या चाळीमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास पूराचे पाणी जाते.

(४) होय.

तहसीलदार, भिवंडी यांचेमार्फत प्राप्त तक्रारीची चौकशी करण्यात आलेली आहे.

(५) सी.आर.झेड.च्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे गौरीपाडा ते नदीनाका या क्षेत्रास केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाकडील कोस्टल रेग्युलेशन झोन (सी.आर.झेड.) च्या तरतुदी लागू आहेत. परंतु सदर सी.आर.झेड.च्या तरतुदी लागू असलेल्या क्षेत्रामध्ये सी.आर.झेड.चे उल्लंघन करुन टोलेजंग इमारती बांधण्यात आलेल्या नाहीत. यास्तव, कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, शासनाने या परिसरातील अनधिकृत बांधकामे रोखण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे :-

- तहसिलदार, भिवंडी यांनी लेखी तक्रारीच्या अनुषंगाने जमिन मालक यांना अनधिकृत उत्खनन व साठा केल्याबाबत रक्कम रुपये ९,०२,५००/- या प्रस्तावित दंडाची रक्कम व खुलासा सादर करणेसाठी कळविले आहे. तसेच प्रस्तावित दंडाची रक्कम व सात बारावर बोजा ठेवण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

- मौजे निजामपुरा येथील स.नं. ९८ व ३१ येथे असलेल्या अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ नुसार ०७ बांधकामधारकांवर गुन्हे दाखल केले आहेत.
- तक्रारीत नमुद कामवारी नदीतील अवैध बांधकामाची चौकशी करुन सदर अनधिकृत बांधकामे दुर करण्याबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिका हद्दीत निर्मळ तलावाच्या परिसरात सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(५५) * ३८७८६ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार महानगरपालिका (जि.पालघर) हद्दीत ऐतिहासिक निर्मळ तलावाच्या परिसरात प्रंचड स्वरुपात अनधिकृत बांधकामे सुरु आहेत व याकडे महानगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्यामुळे दुर्गम तीर्थक्षेत्राचे पावित्र्य नष्ट होण्याच्या मार्गावर असून अधिकारी वर्ग जाणीवपूर्वक कारवाई करित नसल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २४.१०.२०१५ रोजी अथवा नजीकच्या दिनांकास सदर परिसरात अनधिकृत बांधकामे चालू असल्याची तक्रार प्राप्त झाल्याची नोंद महानगरपालिकेच्या अभिलेखात आढळून आली नाही.

तथापि, सदर ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता तलाव क्षेत्रापासून अंदाजे ३० फूट अंतरावर एका तळमजला + २ इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले. सदर अनधिकृत बांधकाम धारकावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच सदर इमारतीचे बांधकाम थांबविण्यात आले असून नोटीस कालावधी संपल्यानंतर निष्कासनाची कारवाई हाती घेण्यात येईल.

उक्त इमारती शेजारी आणखी एक अनधिकृत बांधकाम करण्याच्या उद्देशाने खोदकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानुसार त्याठिकाणी निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

मौजे निर्मळ या तलावाच्या आजूबाजूला मुख्यत्वे आदिवासी व मागासवर्गीय समाजाची वस्ती असून ती अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. त्यातील बहुसंख्य अनधिकृत बांधकामे सन १९९५ पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. अशा बांधकामास शासन धोरणाप्रमाणे संरक्षण आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पोलीस दलाचे आधुनिकिकरण करण्याबाबत**

**(५६) * ३२१८३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिस दल आधुनिकीकरण योजनेअंतर्गत केंद्र शासनाने राज्याला सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ साठी अनुक्रमे रुपये ९२.९३ कोटी व रुपये ७४.९४ कोटी इतक्या पुरविलेल्या निधीचा वापर केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आलेला निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत तसेच पोलीस दल आधुनिकीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सन २०१३-१४ च्या वार्षिक कृती आराखड्यातील भाग-अ (योजनेत्तर) मध्ये केंद्र हिस्स्याचा रु. ४७७२.०३ लाख निधी केंद्र शासनाने वितरीत केलेला नाही. तर, सन २०१४-१५ मध्येही भाग अ (योजनेत्तर) मधील केंद्र हिस्स्याचा रु. ४३६६.९१ लाख निधी केंद्र शासनाने वितरीत केलेला नाही. मात्र, सन २०१३-१४ मध्ये भाग-ब (योजनांतर्गत) मधील केंद्र हिस्स्याची रु. ८७५२.०० लाख रक्कम केंद्र शासनाकडून बांधकामासाठी पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे परस्पर वितरीत झाल्याने ती खर्च झालेली आहे. तसेच, सन २०१४-१५ मध्येही केंद्र शासनाने भाग ब (योजनांतर्गत) मधील केंद्र हिस्स्याचा रु. ७११८.९१ लाख निधी राज्य शासनास रिझर्व बँकेमार्फत वितरीत केलेला आहे.

(२) केंद्र शासनाकडून भाग अ (योजनेत्तर) करिता निधी प्राप्त झालेला नसल्याने तो खर्च करण्यात आलेला नाही. मात्र, भाग ब (योजनांतर्गत) करिता प्राप्त झालेला निधी खर्च  करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी लिंक रोडला लागून असलेल्या सहकारी भूखंडावर रवि इस्टेट प्रा.लि.(साई गॅरेज) यांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(५७) * ३२३१५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील जोगेश्वरी लिंक रोडला लागून असलेल्या न.भू.क. ६५७ -अ या सहकारी भूखंडावर रवि इस्टेट प्रा.लि.(साई गॅरेज) यांनी अतिक्रमण केले असून सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिनांक २० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण करणाऱ्याविरुध्द व केलेले अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, खरे आहे.

(२) होय,

(३) प्रस्तुत प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रमांक ५७९२/१९९६ अन्वये मा.न्यायालयाने दि.१४.१.१९९७ रोजी पुढील आदेशापर्यंत स्थगिती आदेश दिले आहेत. सदर आदेशामुळे अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खार पश्चिम येथे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासकाने केलेला गैरव्यवहार

**(५८) * ३५७३६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खार पश्चिम येथे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये विकासक जॉय (जयंत सोनी) यांनी मोठया प्रमाणात बोगस पुरावे दाखल करुन झोपडया पात्र करुन अतिरिक्त एफएसआय योजनेमध्ये नियमांचे उल्लंघन तसेच शासनाची दिशाभूल करुन गैरव्यवहार केल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) व (२) मौजे बांद्रा, तालुका अंधेरी येथील न.भु.क्र. ई ८६/१०, ई ८६/१२, ई ९९/अ (पै) या मिळकतीवर विकासक जॉय (जयंत सोनी) बिल्डर्समार्फत (१) नवी शेरली माता यशोधरा नगर रहिवासी, (२) नवामाळा, (३) लुंबिनी व (४) कोकणस्थ सह, गृह संस्था, व आम्रपाली रहिवासी या ४ सहकारी गृहनिर्माण संस्थांची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांनी या संस्थांची अनुक्रमे दिनांक २९.८.२००६ (दिनांक २९.७.२००९ व दिनांक २.२.२०१० रोजीचे पुरवणी परिशिष्ट-२) दिनांक २३.६.२००६ दिनांक ३.६.२००९ व दिनांक ३०.६.२०१२ रोजी परिशिष्ट -२ निर्गमित केली आहेत. त्यास अनुसरुन सदर संस्थांच्या एकत्रित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दिनांक २०.५.२०१५ रोजी आशयपत्र दिले आहे.

सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजने संदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गठीत उच्चस्तरीय समिती पुढे दाखल अपील क्रमांक ९/२०१४ मध्ये समितीने अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगनर यांना परिशिष्ट-२ मधील झोपडपट्टीधारकांच्या दुबार पात्रतेबाबत प्राप्त तक्रारी संदर्भात पडताळणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे दि. ५.३.२०१५ रोजी सुनावणी दरम्यान आदेश दिले होते. त्यानुसार वस्तुनिष्ठ अहवाल

दिनांक ५.१०.२०१५ रोजी उच्चस्तरीय समितीस सादर करण्यात आलेला आहे. उच्चस्तरीय समितीने दिनांक २०.११.२०१५ रोजी सदर अहवालावर त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी संबंधित पक्षकारांना दिली आहे. उच्चस्तरीय समितीच्या आदेशानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऐरोली (नवी मुंबई) येथील सिडकोच्या भुखंडावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(५९) * ३१५५९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (नवी मुंबई) येथील महावितरण कॉलनीच्या बाजुला लागून सिडकोच्या भूखंडावरुन उच्चदाबाची विद्युत वाहिनी गेली असून या विद्युत वाहिनीच्या खाली झोपड्यांचे अतिक्रमण झाले असल्याचे माहे, ऑगस्ट २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोच्या भुखंडावर नेव्हा गार्डन सोसायटीच्या या उद्यानामध्ये गणपती पाडा, विटावा, रामनगर, ऐरोली सेक्टर १०,२० ऐरोली गांव तसेच आसपासच्या इतरही परिसरातून नागरिक दररोज व्यायाम व फिरण्यासाठी तसेच लहान मुले खेळण्यासाठी येत असुन त्यांना या झोपड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) अतिक्रमणाबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५५ अंतर्गत कारवाई करण्याचे अधिकार सिडकोस आहेत.

त्यानुसार महावितरण कॉलनीच्या बाजूला सिडकोच्या अखत्यारित येणा-या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीखालील झोपडपट्यांच्या अतिक्रमणावर सिडकोमार्फत कारवाई करण्यात आलेली असुन १४० झोपडया निष्कासित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील ६० इमारती भोगवटा (ऑक्यूपेशन) प्रमाणपत्र न घेता बांधण्यात आल्याबाबत

**(६०) * २९०१५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील बिल्डरांनी व मालकांनी बांधलेल्या ६० इमारती भोगवटा (ऑक्यूपेशन) प्रमाणपत्रा शिवाय बांधण्यात आल्या असल्याची बाब महानगरपालिकेच्या नगररचना कार्यालयाने नुकतीच निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोगवटा प्रमाणपत्राविना असलेल्या इमारती बांधकामामुळे महानगर पालिकेचे दर वर्षी कोट्यावधी रुपयाचे उत्पन्न बुडत असल्याने महानगरपालिका आयुक्तांनी सदर अनाधिकृत बांधकामाविरुद्ध व उक्त प्रकरणी संबंधित दोषी असलेल्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, औरंगाबाद महानगरपालिकेने २०००-०१ ते २०१४-१५ या कालावधीत एकूण १४२७६ प्रकरणात बांधकाम परवानगी प्रदान केली असून, संबंधित मालमत्ताधारकांकडून रुपये २३,१६,६७,४८५/- एवढी बांधकाम परवानगी अनामत रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. सदर रक्कम ही संबंधितांनी भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त केल्यानंतर परत करण्यात येते. वरील प्रकरणामधील केवळ ३२९८ प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्र अदा केलेली आहेत. तसेच उर्वरित मालमत्ताधारकांना भोगवटा प्रमाणपत्र घेण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रकटन देवून आवाहन करण्यात आलेले आहे.

(२) व (३) वरील प्रमाणे बांधकाम परवानगी प्रदान करतांनाच बांधकाम परवानगी अनामत रक्कम वसूली करण्यात येत असून, भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्यामुळे महानगरपालिकेतील उत्पन्न बुडते, अशी वस्तुस्थिती नाही. तसेच बांधकाम परवानगी देतांना त्याची एक प्रत महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागास, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून देण्यात येते. त्यानुसार महानगरपालिकेकडील प्रशासकीय विभाग, अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्ती विरुध्द नियमानुसार कार्यवाही करते. सदर प्रकरणी चौकशी करुन कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

-----------------

## कुंभार वेसजवळील (जि. पुणे) डेंगळे पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(६१) * ३८१८० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभार वेसजवळील डेंगळे पूल (जि. पुणे) जड वाहतूकीने कोसळण्याची भीती महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागारांनी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास दिलेल्या अभिप्रायामध्ये व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सल्लागाराकडून आलेल्या अभिप्रायानुसार या पूलावरुन जड वाहतूक बंद करण्याचा निर्णय केव्हापासून घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर पूलाच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कुंभार वेस जवळील डेंगळे पूलाच्या दुरस्तीचे काम सुरु आहे. सदर पूलाच्या दुरुस्तीच्यावेळी करण्यात आलेल्या तपासण्याच्या आधारे पुणे महानगरपालिकेच्या मान्यताप्राप्त सल्लागाराने दिनांक ९.१०.२०१५ च्या पत्रान्वये सदर पूल तांत्रिक तपासण्या व दुरुस्ती करणेकामी काही दिवस जड वाहतुकीसाठी बंद करणेबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार सदरचा पूल दिनांक २६.१०.२०१५ पासून जड वाहतूकीसाठी तात्पुरता बंद करण्यात आलेला आहे. पूलाच्या दुरस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर पूल पूर्ववत जड वाहतूकीस खुला करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) सदर पूलाच्या दुरुस्तीची कामे पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील शिवाजी नगर येथील महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्याचा भिंत कोसळून झालेला मृत्यु

**(६२) * ३४४१६ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (ईशान्य मुंबई) शिवाजी नगर येथील महानगरपालिका शाळेची भिंत माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास कोसळून एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यु झाला असून काही विद्यार्थी जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षतिग्रस्त कुटुंबियांना वा जखमींच्या कुटुंबियांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक, क्षतिग्रस्त कुटुंबीयांनी मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (मदत व पुनर्वसन), मा. पालकमंत्री (मुंबई उपनगर जिल्हा), मा. राज्यमंत्री (गृह), मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन), जिल्हासंपर्क मंत्री (मुंबई उपनगर जिल्हा), जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर जिल्हा) यांना लेखीनिवेदनाद्वारे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, सदर दुर्घटनेतील जखमी व्यक्तींना महापालिकेच्या राजावाडी रुग्णालय व लोकमान्य टिळक रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा देऊन घरी सोडण्यात आले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेने निविदा न काढताच कत्तलखान्याचा ठेका दिल्याबाबत

**(६३) * ३५४६७ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिकेने बेडग रोडवरील शासकीय अधिकृत कत्तलखान्याचा ठेका निविदा न काढताच बेकायदेशीरपणे एका खाजगी कंपनीस दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महापालिकेचे लाखो रुपयांचे उत्पन्न बुडाले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त कत्तलखान्यामध्ये परवान्यापेक्षा प्रत्यक्षात जास्त प्रमाणात जनावरांची कत्तल करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या सर्व प्रकरणांची चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

महानगरपालिकेमार्फत सन २००६-०७ मध्ये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी कमी देकाराची एकमेव निविदा प्राप्त झाली. त्यामुळे महानगरपालिकेमार्फतच कत्तलखान्याचे काम चालविण्यात आले.

तद्नंतर २००७-०८ मध्ये पुन:श्च एक वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्यात आली. त्यावेळी ३ निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी २ निविदा अपात्र ठरुन वाटाघाटीनंतर मे. बी.ए बेपारी यांची निविदा अंतिम करण्यात आली.

तद्नंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार कत्तलखान्यातील सांडपाणी व टाकाऊ पदार्थ यांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता सदर कंत्राटदारास ३ वर्षाची मुदतवाढ देण्यात आली.

या दरम्यानच्या कालावधीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कत्तलखान्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी महासभेने ठराव घेऊन सदर कंत्राटदारास खाजगीकरणाच्या माध्यमातून १८ वर्षाचा सवलत कालावधी देण्यात आला. सदर कंत्राटदाराने आधुनिकीकरण करतांना या क्षेत्रातील अनुभवी मे. मार्क इंटरनॅशनल फुड स्टफ प्रा. लि. नवी मुंबई यांच्याशी भागीदारी करुन काम पूर्ण केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

दि. ३ जानेवारी, २०१३ रोजी कत्तलखाना सुरु करण्याचे आदेश दिल्यापासून प्रतिमाह रु. २५,०००/- इतकी रक्कम रॉयल्टीच्या माध्यमातून महानगरपालिकेस प्राप्त होत आहे.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार कत्तलखान्याची प्रतिदिन ४५० म्हैस वर्गापासून मांस उत्पादनाची क्षमता आहे. सद्यस्थितीत सरासरी प्रतिदिन २५० म्हैस वर्गीय जनावरांची कत्तल होते.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील डोंगरगाव टेकडीवरील खनिज उत्खननाबाबत

**(६४) * ३९१७६ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) : दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ३५३६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील डोंगरगाव येथील काशी मंदिराला "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून जिल्हा नियोजन समितीने मंजुरी प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीर्थक्षेत्राला लागून टेकडीवर यापूर्वी शासनाने उत्खननाची मंजुरी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीर्थक्षेत्राला लागून टेकडीवर शासनाने उत्खननाची मंजुरी दिली असल्याने सदर मंदिराला व परिसरास धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उत्खननाची मंजुरी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उत्खननाकरिता मंजूर असलेल्या खदानीपासून काशीबाईचे मंदीर व दुधाळ पाणी असणारी विहीर साधारणत: ३५० मीटर अंतरावर आहे. तसेच ब्लास्टींग

करण्यासाठी ग्रामपंचायतीने ना हरकत ठराव दिलेला आहे. त्यामुळे सदर मंदीराला व परिसरात धोका निर्माण होऊ शकतो, हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**बाणेर (जि.पुणे) येथील माजी सैनिकाच्या वसाहतीच्या बांधकामास स्थगिती देण्यात आल्याबाबत**

**(६५) * ३८५६३ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील बाणेर येथील स. न. ३९/५ वर माजी सैनिकाच्या वसाहतीसाठी दिनांक ७ एप्रिल, २०१० रोजी दिलेल्या बांधकाम परवानगीस दिनांक १ डिसेंबर, २०१२ रोजी स्थगिती देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माजी सैनिकाच्या वसाहतीसंबधी मा. राज्यमंत्री यांच्या दालनामध्ये दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी बैठक झाली असूनही सदर बांधकामाच्या परवानगीबाबतचा प्रश्न महानगरपालिकेत अजूनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बाणेर येथील स.न. ३९/१ व ३८/५ वरील बांधकामाबाबत मूळ जमीन मालकातर्फे केलेल्या तक्रारीवरुन, सदर बांधकाम परवानगी प्रस्ताव हा विनासंमतीच्या पोहोच रस्त्यावर असल्याने दिनांक २.११.२०१२ रोजी स्थगिती देण्यात आली होती.
(२) व (३) बाणेर येथील स.नं. ३९/५ या विषयाबाबत मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- स.न. ३९/१, प्लॉट क्र. ९३ मधील परवानगी पुर्नजिवित करण्याच्या प्रक्रियेत आहे.

- स.नं ३९/५ प्लॉट नं. ६६,७३, ८० व ८६ (एकत्रित) या मिळकत विकासकाने सामासिक अंतरातील अनधिकृत बांधकाम न काढल्यामुळे तसेच सुधारीत नकाशे दाखल न केल्यामुळे या बांधकामास दिलेली स्थगिती कायम ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील भायखळा येथील खेळाचे मैदान व उद्यानावर विकासकाने चुकीची पुनर्वसन योजना राबविल्याबाबत**

**(६६) * २९८९५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेची फसवणूक करुन भायखळा येथील एक खेळाचे मैदान व उद्यानावर चुकीची पुनर्वसन योजना राबविल्याबाबत बिल्डरला तत्कालीन पालिका अधिकाऱ्यांनी नाममात्र पाच हजाराचा दंड केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील भायखळा येथील एक खेळाचे मैदान व उद्यानावर पुनर्वसन योजना कार्यान्वित झालेली नसून याबाबतचा प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात आलेला असल्यामुळे याबाबत विकासकास कोणताही दंड आकरण्यात आलेला नाही.

तथापि, विषयांकित प्रकरणी सागरीका को.ऑ.सोसायटी व स्पिनींग वर्ड इंटरप्रायझेस या विकासकाकडून भूकर क्रमांक १९७०,१/१९७०,२/२९७० भायखळा विभागातील महानगरपालिका मालमत्तेचा विकास नियंत्रण नियमावलीत ३३(७) अंतर्गत पुर्नविकासाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता व त्या अनुषंगाने महापालिका भाडेकरुंची शोध यादी (Inventory) तयार करण्याकरीता प्रस्ताव सहाय्यक आयुक्त “ई” विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

प्रस्तावाच्या आवश्यकतेनुसार व महापालिकेच्या धोरणानुसार कमीत कमी एकतरी निवासी भाडेकरु व एकूण कमीतकमी १० भाडेकरु आवश्यक असतात. सदर प्रस्तावामधील वाणिज्य भाडेकरुस रहिवाशी भाडेकरु दाखविण्यात आल्यामुळे, सदर प्रकरणाच्या करण्यात आलेल्या खात्यांतर्गत चौकशीमध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन सहाय्यक आयुक्त (सेवानिवृत्त) यांना शिक्षा म्हणून रु. ५०००/- इतकी रक्कम त्यांच्या मासिक निवृत्ती वेतनातून एकरकमी काढून घेण्यात यावी असे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पारित केले आहेत.

सदर शिक्षेसाठी स्थायी समिती/महानगरपालिका यांची सक्षम प्राधिकारी म्हणून मंजूरी घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीमध्ये इतर ११ अधिकारी/कर्मचारी देखील दोषी आढळले असून, त्यांच्यावर आयुक्तांच्या आदेशानुसार शिक्षादेश बजावण्यात आले आहेत.

-----------------

## नवेगाव (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील अल्ट्राटेक कंपनीतील कामगारांवर होत असलेला अन्याय

**(६७) * ३६३६४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेगाव (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील अल्ट्राटेक कंपनीतील कर्मचाऱ्यांवर कंपनी व्यवस्थापनाकडून अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाकडून किमान वेतन, मुलभूत सुविधा, ओवरटाईम पगार, खानावळ, इतर सुविधा कर्मचाऱ्यांना दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कंपनी व्यवस्थापनाकडून भुसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना व्यवस्थापनामध्ये नोकऱ्या देऊ या अटीवर भुसंपादन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने १५ दिवसांच्या आत सदर समस्याचे निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले असूनही ते अद्याप पुर्ण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी नुसार कामगारांवरील अन्याय दुर करण्यासाठी व भुसंपादन केलेल्या शेतकऱ्यांचा मुलांना व्यवस्थापनामध्ये नोकऱ्या देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, सरकारी कामगार अधिकारी, नागपूर यांनी दि. ०९.१२.२०१५ रोजी केलेल्या निरीक्षणात कंत्राटी कामगारांना अनुसूचित रोजगाराकरीता निश्चित केलेल्या किमान वेतन दरापेक्षा रु. ७/- प्रतिदिन कमी वेतन देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित सरकारी कामगार अधिकाऱ्याने निरीक्षणाअंती दिलेल्या निदेशानुसार कंत्राटदारांनी कामगारांना कमी वेतन दिलेल्या कालावधीतील फरकाची रक्कम रु. १,२४,०९६.६४ दि. १२.१२.२०१५ रोजी अदा केलेली आहे.

(३), (४) व (५) सद्य:स्थितीत अल्ट्राटेक सिमेंट लिमी., आष्टी नवेगांव तारसा, ता. मौदा, जि. नागपूर या कारखान्याचे बांधकाम सुरु असून व्यवस्थापनाने शासनाची रितसर परवानगी घेऊन शेतकऱ्यांची सुमारे २१३ एकर जमीन किंमतीबाबत वैयक्तिक वाटाघाटी करुन विकत घेतलेली आहे.

सदरच्या कारखान्यात सिमेंटचे उत्पादन सुरु होण्यास किमान ६ ते ७ महिन्याचा कालावधी लागणार असून कारखान्याची उत्पादन प्रक्रिया सुरु झाल्यावर ८०% स्थानिक लोकांना रोजगार देण्याची व्यवस्थापनाने तयारी दर्शविली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कात्रज-कोंडवा (जि.पुणे) येथील मरळनगरमध्ये भंगारच्या दुकानात झालेला स्फोट

**(६८) * ३०४९६ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज-कोंडवा (जि.पुणे) या रस्त्यावर खडी मिशन चौकाजवळ मरळनगरमध्ये

भंगाराच्या दुकानात जुन्या तोफगोळयाच्या स्फोटात १ ठार व ४ जखमी झाले असल्याचे दिनांक २ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोट होण्यामागची कारणे काय आहेत

(३) तसेच स्फोटात मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबाला व जखमींना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. परंतू सदर घटना दिनांक ०१.०९.२०१५ रोजी घडली असून सदर घटनेत एकाच्या मृत्यू झाला असून २ जण जखमी झाले आहेत.

(२) आरोपी फजल हुसेन चौधरी व पापा उर्फ निजामुद्दीन अस्लम चौधरी यांनी भाडयाने जागा घेऊन भंगाराचे दुकान चालवत होते. भंगार मालाच्या दुकानामध्ये विनापरवाना, बेकायदेशीर भारतीय स्फोटक कायद्याचे उल्लंघन करुन स्फोटक व वस्तु निष्काळजीपणे हाताळल्याने दुकानात स्फोट झाला. त्यामुळे आरोपीविरुध्द कोंडवा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३५६/२०१५ भा.दं.वि. क्र. ३०४ (अ), ३३७, ३३८, २८६ भारताचा स्फोटक कायदा १८८४ चे कलम ९ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुरु केलेल्या प्रकल्पात झालेली आर्थिक अनियमितता

**(६९) * ३०५०४ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आतापर्यंत तब्बल १०० कोटी रुपये खर्च करण्यात आले असताना देखील गत वर्षात सुरु केलेले बहुतेक सर्व प्रकल्प निरर्थक ठरले असून या प्रकल्पांमध्ये आर्थिक अनियमितता झाल्या असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांवर झालेल्या खर्चाचे तसेच अन्य कामकाजाचे लेखापरीक्षण करण्यात आले असता अनेक बाबींमधील अनियमितता उघड झाली असून हा प्रकल्प चालविणाऱ्या कंपन्यांना लाखो रुपये जादा दिले गेले असल्याने ते वसूल करावे असे लेखापरीक्षकानी अहवालात स्पष्ट नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**(१) पुणे महानगरपालिकेकडे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुमारे २१३७ मे. टन प्रतिदिन क्षमतेचे एकूण ३५ प्रकल्प आहेत.

सदर प्रकल्प उभारणे व देखभाल दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिका व केंद्र शासनाने सन २००५ पासून आतापर्यंत सुमारे रुपये ६३.८७ कोटी इतका खर्च केला आहे.

सन २०१४-१५ या वर्षात पुणे महानगरपालिकेमार्फत एकुण ३ बायोगॅस प्रकल्प व १ मॅकॅनिकल कंपोस्ट प्रकल्प उभारला आहे. सदरचे सर्व प्रकल्प सुरु असून, या प्रकल्पांत कचऱ्यावर पूर्ण क्षमतेने नियमितपणे प्रक्रिया करण्यात येते.
(२) सदर प्रकल्पावर झालेल्या खर्चाचे तसेच अन्य कामकाजाचे लेखा परिक्षण पुणे महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण विभागाने केले आहे.

सदर लेखा परिक्षण अहवालामध्ये बिलापोटी जादा रक्कम अदा करणे, भूईभाडे वसुल न करणे, विलंबापोटी दंड वसुली न करणे, अनामत पोटी रक्कम वसुल न करणे इत्यादी कारणास्तव रुपये ४६,५०,८४९/- इतकी वसुलपात्र रक्कम असल्याचा आक्षेप असून त्याव्यतिरिक्त परफॉर्मन्स् गॅरंटी न घेणे, विद्युत देयकाची रक्कम वसुल न करणे, इत्यादी आक्षेप नोंदविलेले आहेत.
(३) लेखा परिक्षणात नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने खालील प्रमाणे वसुलीची कार्यवाही केली आहे:-

- बिलापोटी जादा अदा केलेली रक्कम रुपये २०,०२,१४२/-
- भूईभाडयापोटी येणे असलेली रक्कम रुपये ४,०९,७१३/-
- विलंब दंडापोटी येणे असलेली रक्कम रुपये १,९९,०००/-
- अनामत रक्कमेपोटी येणे असलेली रक्कम रुपये ५०,०००/- अशी एकुण रक्कम रुपये २६,६०,८५५/- वसुल करण्यात आली असून, उर्वरित रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच अन्य लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने विहित पध्दतीने पूर्तता करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

सदर प्रकरणी दोषी आढळून आल्यास संबंधीतांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येईल.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.